रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

• वर्ष १९ • अंक ६१
www.ramprahar.com

• गुरुवार, १७ सप्टेंबर २०२६ • पाने ८ • किंमत ₹२




मुंबई : भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार नितीन नबीन यांनी गणेशोत्सवानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वर्षा निवासस्थानी भेट देत गणरायाचे दर्शन घेतले. यावेळी मुख्यमंत्र्यांनी पत्नी अमृता यांच्यासह त्यांचे स्वागत केले.

## अंतरंग

आजपासून राज्यात सेवा संकल्प अभियान/३

कर्जत-मुरबाड महामार्गावर हिट अँड रन/५

गणेशोत्सव दर्शन छायाचित्रे/६, ८



# महाराष्ट्राच्या संस्कृतीचे जागतिक दर्शन

## विदेशी वाणिज्यदूतांनी घेतले मुंबईच्या बाप्पांचे दर्शन

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेचे दर्शन जगभरातील पर्यटकांना घडवणाऱ्या गणेशोत्सवाच्या निमित्ताने विविध देशांच्या वाणिज्यदूतांनी मुंबईतील विविध गणेश मंडळांना भेट देऊन बाप्पांचे दर्शन घेतले. यामध्ये फिनलंड, फ्रान्स, थायलंड, नॉर्वे, चीन, बेल्जियम, स्वीडन आणि इजिप्त या देशांच्या प्रतिनिधींचा समावेश होता. माटुंगा येथील खालसा महाविद्यालयात परदेशी पाहुण्यांचे पारंपरिक फेटे बांधून आणि पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.



त्यानंतर प्रतिनिधींनी माटुंगा येथील जीएसबी गणपती, वडाळा येथील जीएसबी सार्वजनिक गणेशोत्सव, गणेश गल्ली येथील 'मुंबईचा राजा' आणि गिरगावातील केशवजी नाईक चाळ येथील गणपतीचे दर्शन घेतले. यावेळी त्यांना महाराष्ट्राचा गणेशोत्सव, त्याची ऐतिहासिक परंपरा आणि मुंबईतील प्रसिद्ध सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांची माहिती देण्यात आली. पर्यटनमंत्री शंभूराज देसाई म्हणाले की, गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव नसून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाचे, सामाजिक एकतेचे आणि लोकसहभागाचे प्रतीक आहे. या उत्सवाच्या माध्यमातून महाराष्ट्राची कला, परंपरा, इतिहास, लोकजीवन आणि आतिथ्यशीलता जगभर पोहोचत आहे. आंतरराष्ट्रीय पर्यटकांना महाराष्ट्राच्या सांस्कृतिक पर्यटनाचा अनुभव मिळावा यासाठी पर्यटन विभागाच्या माध्यमातून विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत.

या उपक्रमात फिनलंडच्या उपवाणिज्यदूत जोन्ना सुनी, फ्रान्सचे वाणिज्यदूत पॅट्रिक लेव्हरिनो आणि सामंथा नुवेल, थायलंडच्या वाणिज्यदूत सिरिपॉर्न सुपानिमितविसेतकुल, थितीपोर्न चुचिन्नावत, नाक्रिसोर्न क्लाइकाओ आणि व्हाईस कॉन्सुल अरुणलुक इम्सुब, नॉर्वेच्या वाणिज्यदूत मोनिका ओम्मुंडसेन नागेलगार्ड आणि जेनी ब्रँडाल, बेल्जियमचे वाणिज्यदूत पियरे स्टेव्हर्लिन्क तसेच स्वीडनच्या वाणिज्यदूतांच्या पत्नी साने यामादा यांनी सहभाग घेतला. चीनच्या वतीने वाणिज्यदूत जी श्युएहुई, कॉन्सुल वांग जिनशेंग, उपवाणिज्यदूत मा झोउचेन, झू युचियान, लिन, वू तसेच वाणिज्य दूतावासातील अन्य अधिकारी व कुटुंबीय, तर इजिप्तच्या वाणिज्यदूत जनरल दिना अल अहे यांनीही सहभाग घेतला.

राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी उपक्रमाला शुभेच्छा दिल्या. पर्यटनचे अपर मुख्य सचिव संजय खंदारे व मुंबई शहरच्या जिल्हाधिकारी आंचल गोयल यांनी परदेशी मान्यवरांचे आभार मानले. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक निलेश गटणे, मुंबई शहरचे अपर जिल्हाधिकारी बाप्पासाहेब थोरात, महाव्यवस्थापक चंद्रशेखर जयस्वाल व व्यवस्थापक मानसी कोठारे उपस्थित होते.

## गव्हाण फाट्यावर महिलेची हत्या

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलजवळील गव्हाण फाटा येथे एका महिलेची हत्या करून तिचा मृतदेह परिसरातील नाल्यात पुरून ठेवल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला असून या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

गव्हाण फाटा येथील वाहतूक पोलीस चौकीजवळ एका महिलेची हत्या करून तिचा मृतदेह नाल्यात पुरून ठेवल्याची माहिती पनवेल शहर पोलिसांना मिळाली. माहिती मिळताच परिमंडळ-३ चे सहाय्यक पोलीस आयुक्त मयूर भुजबळ, पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळा कुंभार, पोलीस निरीक्षक नासिर पटेल तसेच गुन्हे शाखेची पथके तातडीने घटनास्थळी दाखल झाली. पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी करून नाल्यातून महिलेचा मृतदेह बाहेर काढून ताब्यात घेतला. मृतदेह शवविच्छेदनासाठी उपजिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आला आहे.

दरम्यान, पोलिसांनी परिसराची कसून पाहणी तसेच चौकशी सुरू केली असून या प्रकरणाच्या तपासादरम्यान काही संशयितांना ताब्यात घेतल्याची माहिती मिळाली आहे.महिलेची ओळख तसेच हत्या नेमक्या कोणत्या कारणातून झाली, याचा तपास पनवेल शहर पोलीस करीत आहेत. या घटनेमागील कारण आणि हत्येतील आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून विविध दिशेने तपास सुरू आहे.

## तरुण बेपत्ता

**पनवेल** : खारघर सेक्टर ११ येथून ३१ वर्षीय तरुण बेपत्ता झाल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात मिसिंग रजिस्टर क्रमांक ७४/२०२६ अन्वये नोंद करण्यात आली असून पोलिसांकडून बेपत्ता तरुणाचा शोध सुरू आहे. संदीप इंगळे असे बेपत्ता तरुणाचे नाव आहे. उंची पाच फूट पाच इंच, शरीरयष्टी मजबूत, रंग सावळा, केस मध्यम काळे, डोळे काळे असून चेहरा गोल आहे. घरातून निघताना त्याने निळ्या रंगाचा शर्ट, काळ्या रेघा असलेली पांढऱ्या रंगाची पॅन्ट परिधान केली होती. दरम्यान, बेपत्ता तरुणाबाबत कोणाला माहिती मिळाल्यास अथवा तो आढळल्यास तातडीने खारघर पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

## जुगारप्रकरणी तिघांविरोधात गुन्हा

**पनवेल** : तीन पत्ती जुगारावर कारवाई करत खांदेश्वर पोलिसांनी आकाश शामराव यादव, अर्जुन किशोर जाधव, सुरज सुरेश माझी यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. आसूडगाव एक्स्प्रेस हायवेच्या ब्रिजच्या बाजूला रेल्वे बॅटरीच्या लागून रहदारीच्या मोकळ्या सार्वजनिक ठिकाणी तीन पत्ती जुगार खेळत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती.

## २,४१४ शाडू मातीच्या गणेशमूर्तींचे विसर्जन; पर्यावरणप्रेमींचा सन्मान

**नवी मुंबई : बातमीदार**

महापौर व आयुक्तांनी नागरिकांना केलेल्या पर्यावरणपूरक, प्लास्टिकमुक्त गणेशोत्सव साजरा करण्याच्या आवाहनास प्रतिसाद देत मोठ्या संख्येने नागरिकांनी प्लास्टर ऑफ पॅरिसच्या गणेशमूर्तीऐवजी शाडूच्या मूर्तींची प्रतिष्ठापना करीत पर्यावरणशील दृष्टीकोन जपल्याचे दीड दिवसांच्या विसर्जनप्रसंगी दिसून आले. दीड दिवसांच्या २,४१४ शाडूच्या श्रीगणेशमूर्तींचे विसर्जन संपन्न झाले असून, शाडूच्या मूर्तींची प्रतिष्ठापना करणाऱ्या पर्यावरणप्रेमी नागरिकांचा आकर्षक कापडी पिशव्या व प्रशस्तिपत्र देऊन विसर्जनस्थळी विशेष सन्मान करण्यात आला.

निर्माल्य संकलन व वाहतुकीची स्वतंत्र यंत्रणा; निर्माल्याचे पावित्र्य राखून योग्य विल्हेवाटस्वच्छ सर्वेक्षणामध्ये नवी मुंबई महानगरपालिकेचा समावेश देशात सातत्याने अग्रक्रमावर असणाऱ्या सर्वोत्तम स्वच्छ शहरांच्या 'सुपर स्वच्छ लीग'मध्ये झालेला असून, त्यादृष्टीने विसर्जनस्थळांवरील स्वच्छतेकडे विशेष लक्ष देण्यात आले. सर्व विसर्जनस्थळी ओले व सुके निर्माल्य ठेवण्यासाठी स्वतंत्र कलशांची व्यवस्था करण्यात आली होती. हे निर्माल्य स्वतंत्र वाहनांद्वारे तुर्भे येथील प्रकल्पस्थळी नेण्यात आले असून, त्या ठिकाणी निर्माल्याचे पावित्र्य राखून त्याची योग्य विल्हेवाट लावण्याची स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे. गणेश विसर्जन नवी मुंबई पालिका व पोलीस यंत्रणेला सहकार्य करत सुव्यवस्थित पार पाडल्याबद्दल महापौर सुजाता पाटील व आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी नागरिकांचे आभार मानले आहेत.

## पनवेल महानगरपालिका क्षेत्रात दीड दिवसांच्या गणरायांना भावपूर्ण निरोप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महापालिका क्षेत्रातील कळंबोली, कामोठे, पनवेल, खारघर या चारही प्रभागांत व नावडे उपविभागात दीड दिवसांच्या सुमारे सात हजार ६२९ घरगुती गणपतींचे भक्तिमय वातावरणात नियोजनबद्धरित्या शांततेत विसर्जन करण्यात आले. माझी वसुंधरा ७.० अंतर्गत स्वच्छ, सुंदर आणि प्रदूषणमुक्त पनवेलसाठी पनवेल महानगरपालिका विविध उपक्रम राबवत आहे.



या अंतर्गतच सणांचे पावित्र्य आणि पर्यावरणाचे भान राखले जावे यासाठी महापौर नितीन पाटील, आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी 'उत्सव गणरायाचा, जागर पर्यावरणाचा' ही मोहीम हाती घेतली आहे. गणेशभक्तांच्या सोयीसुविधांसाठी पालिकेच्या बांधकाम, आरोग्य, विद्युत, परवाना, भांडार, वाहन, वैद्यकीय व पर्यावरण विभागांच्या माध्यमातून समन्वय साधून विसर्जन घाटांवर संपूर्ण तयारी करण्यात आली होती. याकामी विविध एनजीओ, सामाजिक संघटनांचेही महापालिकेला सहकार्य लाभले.

यावर्षी महापालिकेच्या बांधकाम विभागाच्या वतीने एकूण १०६ ठिकाणी विसर्जनाची सोय करण्यात आली आहे. यामध्ये ७७ ठिकाणी नैसर्गिक विसर्जन ठिकाणे असून २९ ठिकाणी कृत्रिम तलावांची विसर्जनासाठी सोय करण्यात आली आहे. या सर्व विसर्जनस्थळी सुरक्षारक्षक, विद्युत व्यवस्था, सीसीटीव्ही, स्टेज, टॉवरची सोय, टेबल-खुर्च्या, लाऊडस्पीकर, निर्माल्य कलश, लाइफ जॅकेटची सोय करण्यात आली होती. दरम्यान, महापौर नितीन पाटील व माजी सभागृह नेते नगरसेवक परेश ठाकूर यांनी बल्लाळेश्वर विसर्जन तलावाला भेट देऊन कामकाजाची माहिती घेतली.

विसर्जन कार्यक्रम सुरळीत पार पडावा यासाठी सर्व प्रभाग सभापती, सर्व महापालिका सदस्यांनी आपापल्या प्रभागांमधील विसर्जनस्थळांना भेटी देऊन मार्गदर्शन केले. तसेच आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, अतिरिक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त वैभव विधाते, उपायुक्त स्वरूप खारगे, उपायुक्त रविकिरण घोडके, उपायुक्त नानासाहेब कामठे, उपायुक्त अभिषेक पराडकर, शहर अभियंता राजेश कर्डिले, सहाय्यक आयुक्त डॉ. रूपाली माने, सहाय्यक आयुक्त सुबोध ठाणेकर, चारही प्रभाग अधिकारी, महापालिका अधिकारी, कर्मचारी यांनी पालिकेच्या सर्व विसर्जनस्थळांना भेटी दिल्या.

## भरती परीक्षा प्रक्रियेसाठी सूचना पाठवण्याचे आवाहन

**नवी मुंबई : बातमीदार**

राज्यातील भरती परीक्षा पद्धतीच्या विविध बाबींचा सर्वंकष अभ्यास करून त्यात आवश्यक सुधारणा करण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली १२ ऑगस्ट २०२६ रोजी झालेल्या बैठकीत भरती परीक्षा पद्धतीचे संपूर्ण पुनर्विलोकन करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव (सेवा) व्ही. राधा यांच्या अध्यक्षतेखाली सात सदस्यीय समिती स्थापन करण्यात आली असून, कोकण विभागातील विद्यार्थी, उमेदवार, शैक्षणिक संस्था, तज्ज्ञ तसेच भरती परीक्षा प्रक्रियेशी संबंधित घटकांनी आपले अनुभव व रचनात्मक सूचना समितीपर्यंत पोहोचवाव्यात, असे आवाहन विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल यांनी केले आहे.

भरती परीक्षा प्रक्रियेत प्रश्नपत्रिका तयार करणे व त्यांची सुरक्षित हाताळणी, परीक्षा केंद्रांचे व्यवस्थापन, परीक्षेची सुरक्षितता व विश्वासार्हता, आधुनिक तंत्रज्ञानाचा योग्य वापर, विविध यंत्रणांमधील समन्वय, उमेदवारांशी संवाद व तक्रार निवारण तसेच परीक्षा प्रक्रिया अधिक सुलभ व उमेदवाराभिमुख करण्याच्या दृष्टीने विविध बाबींचा समितीमार्फत अभ्यास करण्यात येत आहे. या अभ्यासाचा महत्त्वाचा भाग म्हणून राज्यातील महसूल विभागांमध्ये प्रत्यक्ष सल्लामसलत आयोजित करण्यात येत आहे. कोकण विभागासाठी सल्लामसलत २९ सप्टेंबर रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत आयोजित करण्यात आली आहे.

## महाराष्ट्र बॉडी बिल्डर्स असोसिएशनच्या अध्यक्षपदी संदीप जोशी



**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र बॉडी बिल्डर्स असोसिएशनच्या २०२६ ते २०३० या कालावधीसाठी कार्यकारिणीची निवड बिनविरोध झाली आहे. यात अध्यक्षपदी आमदार संदीप जोशी यांची, तर चेअरमनपदी डॉ. संजय मोरे, छत्रपती संभाजीनगर यांची निवड करण्यात आली. पुण्यातील वाकड येथील सौंदर्य गार्डन येथे ९ सप्टेंबर रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत ही निवड प्रक्रिया पार पडली. नवीन कार्यकारिणीत उपाध्यक्षपदी डॉ. पद्मसिंह पाटील (धाराशिव), नामदेवराव मोहिते (सांगली), जगदीश कासट (सातारा), शरद चव्हाण (पुणे), भागवत वराड (बीड), राजकुमार सुरवसे (सोलापूर), मधुकर गायकवाड (अहिल्यानगर), राजेश वानखेडे (ठाणे) आणि राजू वरकड (छत्रपती संभाजीनगर) यांची निवड झाली आहे. सरचिटणीसपदी अ‍ॅड. सचिन रणपिसे (छत्रपती संभाजीनगर), खजिनदारपदी राजेश सावंत (पिंपरी-चिंचवड) आणि सहचिटणीसपदी दिनेश शेळके (रायगड) यांची निवड करण्यात आली. संयोजक सचिवपदी रामकृष्ण चितळे (सांगली), नरेंद्र कदम (पश्चिम ठाणे), राहुल परिट (कोल्हापूर), राजेश रांगडे (पालघर), दिलीप धुमाळ (पुणे), नारकर किशोर (रायगड) आणि अरुण भोईर (ठाणे) यांची निवड झाली आहे. कार्यकारिणीच्या सदस्यपदी मदन कडू (मुंबई), किशोर सोनुसकर (सिंधुदुर्ग), राजेश नागरे (पुणे), मनोज गायकवाड (अहिल्यानगर), भाऊदास सोनवणे (नाशिक), विजय मोरे (कोल्हापूर), प्रकाश दामभाडे (धुळे), महावीर धक्का (जालना), मनोजकुमार तपासे (सातारा), योगेश कांबळे (पुणे) आणि रुपेश पिल्ले (पुणे) यांची निवड करण्यात आली. या निवडणूक प्रक्रियेत निवडणूक अधिकारी म्हणून वरिष्ठ वकील अ‍ॅड. संभाजी पानसरे यांनी काम पाहिले. संघटनेच्या नव्या कार्यकारिणीच्या माध्यमातून महाराष्ट्रातील शरीरसौष्ठव क्षेत्राला अधिक चालना देण्यासह खेळाडूंना विविध संधी आणि सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर दिला जाणार आहे. अध्यक्षपदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल आमदार संदीप जोशी यांचे तसेच नवनिर्वाचित कार्यकारिणीचे विविध स्तरांतून अभिनंदन करण्यात येत आहे.

## पनवेलमध्ये विशेष मतदार नोंदणी शिबिरांचे आयोजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारत निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार महाराष्ट्रात विशेष मतदार यादी तपासणी कार्यक्रम-२०२६ सुरू आहे. या कार्यक्रमात ३१ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर या काळात मतदार यादीतील चुका, नावे आणि इतर बाबींविषयी अर्ज व हरकती स्वीकारल्या जात आहेत. या पार्श्वभूमीवर १८८-पनवेल विधानसभा मतदारसंघातील सर्व मतदान केंद्रांवर १९, २०, २६ आणि २७ सप्टेंबर रोजी विशेष मतदार नोंदणी शिबिरे घेण्यात येणार आहेत.

या चारही दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी संबंधित केंद्रावर उपस्थित राहतील. या शिबिरांमध्ये मतदार यादीतील चुका दुरुस्त करता येतील. तसेच नवीन मतदारांना नाव नोंदवता येईल. मतदार यादीतून नाव काढण्याची विनंती करता येईल. पात्र असूनही मतदार यादीत नाव नसलेल्या नागरिकांना नाव नोंदवण्याची संधी मिळेल. नवीन मतदार म्हणून नाव नोंदवण्यासाठी नमुना ६, मतदार यादीतून नाव काढण्यासाठी नमुना ७, तसेच नाव, पत्ता किंवा इतर माहिती दुरुस्त करण्यासाठी नमुना ८ भरता येईल.

नागरिकांनी आवश्यक कागदपत्रे घेऊन आपल्या मतदान केंद्रावर जावे आणि या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. या शिबिरांचे नियोजन करण्याच्या सूचना संबंधित अधिकारी आणि पर्यवेक्षकांना देण्यात आल्या आहेत. सर्व मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांनी या चारही दिवशी आपल्या नेमून दिलेल्या केंद्रावर उपस्थित राहून मतदार नोंदणी आणि दुरुस्तीचे काम करावे, असे आदेश १८८-पनवेल विधानसभा मतदारसंघाचे मतदार नोंदणी अधिकारी पवन चांडक यांनी दिले आहेत.



**पनवेल : आधुनिक भारताचे विश्वकर्मा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या जयंती दिनानिमित्त साजरा करण्यात येणाऱ्या राष्ट्रीय अभियंता दिनानिमित्त मंगळवारी महापालिका मुख्यालयात आयुक्त मंगेश चितळे यांच्या हस्ते सर विश्वेश्वरय्या यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, शहर अभियंता राजेश कर्डिले, कार्यकारी अभियंता विलास चव्हाण, कनिष्ठ अभियंते उपस्थित होते.**

## एआय आणि उपग्रह प्रतिकृती निर्मितीवर पिल्लई कॉलेजचे प्रेरणादायी सेमिनार

**मुरूड : प्रतिनिधी**

तंत्रज्ञानाच्या झपाट्याने बदलणाऱ्या युगात कृत्रिम बुद्धिमत्ता एआय आणि अंतराळ विज्ञानाचे वाढते महत्त्व लक्षात घेऊन पिल्लई कॉलेज, रसायनी यांच्या वतीने सर एस. ए. हायस्कूल व स्व. म. ल. दांडेकर कनिष्ठ महाविद्यालय, मुरूड-जंजिरा येथे बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी एकदिवसीय सेमिनार आयोजित करण्यात आला.

'कृत्रिम बुद्धिमत्ता आणि उपग्रह प्रतिकृती निर्मिती' या विषयावर आयोजित या सेमिनारचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना एआय व अंतराळ तंत्रज्ञान क्षेत्रातील विविध करिअरच्या संधींची माहिती देणे तसेच भविष्यातील रोजगार व शिक्षणाच्या वाटांबाबत मार्गदर्शन करणे हा होता. कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक पिल्लई कॉलेजचे आयुष बाबरे आणि त्यांच्या सहकारी चमूने विद्यार्थ्यांना उपग्रह तंत्रज्ञानाच्या मूलभूत संकल्पना सोप्या पद्धतीने समजावून सांगितल्या.

केवळ सैद्धांतिक माहिती न देता विद्यार्थ्यांकडून प्रत्यक्ष उपग्रह प्रतिकृती तयार करून घेण्यात आल्या. या प्रात्यक्षिकामुळे विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव घेता आला. यावेळी मार्गदर्शन करताना आयुष बाबरे म्हणाले की, आजचे विद्यार्थी उद्याचे शास्त्रज्ञ आणि तंत्रज्ञ आहेत. एआय आणि स्पेस टेक्नॉलॉजी क्षेत्रात भारतासह जगभरात मोठ्या प्रमाणावर संधी निर्माण होत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी या विषयांचा सखोल अभ्यास करणे आवश्यक आहे. सेमिनारदरम्यान विद्यार्थ्यांनी उपग्रह निर्मिती, अंतराळ संशोधन तसेच या क्षेत्रातील शैक्षणिक व करिअरच्या संधींबाबत विविध प्रश्न विचारले. मार्गदर्शकांनी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना समर्पक उत्तरे दिली.

### दुखवटा

## अजित खोत



**मुरूड** : नांदगावचे रायगड भूषण, कुलाबा जीवनगौरव व अन्य अनेक पुरस्कारप्राप्त पत्रकार उदय खोत यांचे ज्येष्ठ बंधू अजित मधुसूदन खोत (७२) यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने शुक्रवारी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक विवाहित मुलगा, एक विवाहित कन्या, सून, जावई, नात, आई आणि तीन बंधू व तीन भगिनी असा परिवार आहे. त्यांचा दशक्रिया विधी नांदगावच्या अमृतेश्वर मंदिरनजीकच्या स्मशानभूमीत २० सप्टेंबर रोजी सकाळी ९ वाजता करण्यात येणार आहे.

रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १९ ◆ अंक ६१
www.ramprahar.com
◆ गुरुवार, १७ सप्टेंबर २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २



मुंबई : राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धनमंत्री पंकजा मुंडे यांच्या रामटेक या शासकीय निवासस्थानी विराजमान गणरायाचे भाजप प्रदेश सचिव तथा पनवेलचे लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांनी दर्शन घेतले.

# आजपासून राज्यात सेवा संकल्प अभियान; महिनाभर विविध उपक्रम

**मुंबई : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संवैधानिक पदावरील कारकिर्दीला २५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने 'सेवा परमो धर्मः' या भावनेतून सामान्य नागरिकांपर्यंत सेवा पोहचविण्याच्या प्रयत्नांना अधिक व्यापक स्वरूप देण्यासाठी केंद्र आणि राज्य शासनाकडून विविध सेवा उपक्रम राबविले जात आहेत. याच भावनेतून महाराष्ट्र शासनाने १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या कालावधीत राज्यात सेवा संकल्प अभियान राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

पंतप्रधान मोदींच्या वाढदिवसापासून सुरू होणाऱ्या या अभियानातील सेवा सेतू अभियान हा नागरिकाभिमुख महत्त्वाचा उपक्रम आहे. प्रत्येक तालुका स्तरावर शिबिरे आयोजित करून राज्य व केंद्र शासनाच्या विविध योजनांचे लाभ नागरिकांना थेट उपलब्ध करून देण्यात येणार आहे.



अभियानात 'इनोव्हेशन चॅलेंज'च्या माध्यमातून युवा, विद्यार्थी, स्टार्टअप्स, व्यावसायिक, कॉर्पोरेट इनोव्हेटर्स तसेच ग्रामीण भागातील नवनवीन उपाय विकसित करणाऱ्या व्यक्तींना जोडण्यात येणार आहे.

### पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या २५ वर्षांच्या सार्वजनिक जीवनाचे औचित्य

सेवा माझे योगदान या उपक्रमातून गाव आणि वाड्यांमध्ये युवक, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच विविध क्षेत्रांतील व्यक्तींच्या सहभागातून स्थानिक गरजांनुसार सेवाकार्ये केली जाणार आहेत. विकसित भारत संकल्प यात्रा अंतर्गत महत्त्वाच्या व परिवर्तनकारी प्रकल्पांची माहिती संकलित करून त्यांच्या माध्यमातून जीवनमान, सुरक्षा, अर्थव्यवस्था, पायाभूत सुविधा आणि संधींमध्ये झालेल्या बदलांची माहिती व्यापकपणे प्रसिद्ध केली जाणार आहे. सेवा ज्योत यात्रा प्रत्येक गावात, तर शहरी भागात बाइक रॅलीच्या माध्यमातून आयोजित केली जाईल. प्रमुख ठिकाणी विकसित भारत २०४७ आणि विविध कल्याणकारी योजनांची माहिती देऊन संकल्प घेतला जाईल.

विद्यार्थ्यांसाठी चित्रकला व वक्तृत्व स्पर्धा, अंगणवाडीतील मुलांसह मातांचा सहभाग असलेला अंगणवाडी उत्सव, योजनांचा प्रत्यक्ष लाभ घेतलेल्या नागरिकांच्या घरी जाऊन दीप प्रज्वलित करण्याचा आशीर्वादाचा दिवा आणि योजनांमुळे जीवनमानात झालेला सकारात्मक बदल मांडणाऱ्या बदलाची गोष्ट या उपक्रमांचीही आखणी करण्यात आली आहे.

अशा प्रकारे सेवा वितरणापासून जनसहभागापर्यंत, नवोपक्रमापासून स्वच्छतेपर्यंत आणि विकासकामांच्या माहितीपासून लाभार्थ्यांच्या यशोगाथांपर्यंत विविध घटकांना एकत्र आणत सेवा संकल्प अभियान हे विकास आणि संवाद यांना जोडणारे बहुआयामी अभियान म्हणून आकार घेत आहे.

# महिला शेतकऱ्यांसाठी प्रशासकीय व्यवस्था

## अधिकाऱ्यांची नियुक्ती

**मुंबई : प्रतिनिधी**

महिला शेतकऱ्यांना त्यांच्या हक्कांसाठी कायदेशीर आणि प्रशासकीय पातळीवर सक्षम करण्यासाठी राज्य शासनाने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम २०२६च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कृषी विभागाने अधिसूचना जारी करून स्वतंत्र प्रशासकीय व्यवस्था निश्चित केली आहे.

अधिसूचनेनुसार ग्रामपंचायत क्षेत्रात महिला शेतकऱ्यांशी संबंधित कार्यवाहीसाठी सहाय्यक कृषी अधिकारी, तर नगरपंचायत क्षेत्रासाठी कृषी अधिकारी (विस्तार) यांची पदनिर्देशित अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. संबंधित निर्णयाविरुद्ध अपील करण्यासाठी तालुका कृषी अधिकारी हे अपील अधिकारी असतील. त्यामुळे महिला शेतकऱ्यांच्या तक्रारी, अधिकार आणि संबंधित प्रशासकीय कार्यवाही स्थानिक पातळीवरच अधिक सुलभ होणार आहे.



मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली महिला शेतकरी सक्षमीकरण परिषद या अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीवर सर्वोच्च देखरेख ठेवण्यासाठी आणि विविध शासकीय विभागांमध्ये समन्वय साधण्यासाठी एक उच्चस्तरीय महिला शेतकरी सक्षमीकरण परिषद स्थापन करण्यात आली आहे. उपमुख्यमंत्री तसेच कृषी, महिला व बालविकास, ग्रामविकास, सहकार, पशुसंवर्धन, वित्त, वन, महसूल आणि नगरविकास आदी विभागांचे मंत्री परिषदेचे सदस्य असतील. कृषी विभागाचे सचिव सदस्य-सचिव म्हणून काम पाहतील.

पारंपरिकदृष्ट्या राज्यातील बहुतांश शेतजमीन कुटुंबातील पुरुष सदस्याच्या नावावर असते. यामुळे शेतात अहोरात्र राबूनही महिलांना 'शेतकरी' म्हणून अधिकृत ओळख मिळत नव्हती. परिणामी त्यांना बँक कर्ज, बियाणे-खते अनुदाने किंवा इतर सरकारी योजनांच्या लाभापासून वंचित राहावे लागत होते. या नवीन कायद्यामुळे जमिनीच्या मालकी हक्काची अट शिथिल करण्यात आली असून प्रत्यक्ष शेती करणाऱ्या प्रत्येक महिलेला संस्थात्मक पाठबळ आणि स्वतंत्र ओळख मिळणार आहे. या परिषदेला तांत्रिक मदत करण्यासाठी जिल्हा व तालुका पातळीवर विशेष समित्यादेखील कार्यरत राहतील. या क्रांतिकारी निर्णयामुळे राज्यातील महिला शेतकरी आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी आणि सक्षम होणार आहेत

महिला शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर विविध विभागांची धोरणे आणि प्रशासकीय यंत्रणा एकत्रितपणे काम करण्यासाठी ही परिषद महत्त्वाची ठरणार आहे. अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी, स्थानिक पातळीवरील कार्यवाही आणि विभागांमधील समन्वय यासाठी नव्या व्यवस्थेचा उपयोग होणार आहे.

## पीएफची वेतन मर्यादा वाढवली

**नवी दिल्ली** : केंद्र सरकारने देशभरातील कर्मचाऱ्यांसाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेत कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेंतर्गत (ईपीएफओ) अनिवार्य कव्हरेजची वेतन मर्यादा १५ हजार रुपयांवरून २५ हजार रुपये प्रति महिना केली आहे. या निर्णयामुळे १५ हजार ते २५ हजार रुपये मासिक वेतन असलेल्या ५१ लाखांहून अधिक अतिरिक्त कर्मचाऱ्यांना ईपीएफओच्या कक्षेत आणले जाण्याची अपेक्षा आहे.

केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले की, यापूर्वी ईपीएफओच्या अनिवार्य कव्हरेजसाठी वेतन मर्यादा १५ हजार रुपये होती. ही मर्यादा सप्टेंबर २०१४मध्ये निश्चित करण्यात आली होती. त्यानंतर १२ वर्षांनी त्यात बदल करण्यात आला असून आता ही मर्यादा २५ हजार रुपये करण्यात आली आहे.

# भीषण कार अपघातात एकाच कुटुंबातील पाच जणांचा मृत्यू

## शहापूरजवळ दुर्घटना; सहा जण जखमी

**शहापूर : प्रतिनिधी**

मुंबई-नाशिक महामार्गावरील आटगाव येथे रस्त्याच्या कडेला गेल्या दोन वर्षांपासून बंद स्थितीत उभ्या असलेल्या ट्रकवर तांत्रिक बिघाड झालेली कार धडकून बुधवारी (दि.१६) दुपारी भीषण अपघात झाला. यात एकाच कुटुंबातील पाच जणांचा मृत्यू झाला, तर सहा जण गंभीर जखमी झाले आहेत. हे सर्वजण नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर येथे देवदर्शन घेऊन मुंबईतील जोगेश्वरी येथे घरी परतत असताना हा अपघात झाला.

अपघातग्रस्त जयस्वाल कुटुंब बुधवारी पहाटे एका कारने नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर येथे देवदर्शनसाठी गेले होते. तिथे देवदर्शन झाल्यानंतर ते पुन्हा कारने घरी परतत असताना दुपारी १.१५च्या सुमारास शहापूर येथील आटगाव परिसरात कारमध्ये तांत्रिक बिघाड झाला आणि ही कार गेल्या दोन वर्षांपासून बंद स्थितीत उभ्या असलेल्या ट्रकवर जाऊन आदळली.



या भीषण अपघातात कारमधील श्रीराम जयस्वाल (३४), सुरज जयस्वाल (२८), आयुष जयस्वाल (८) आणि अवंतिका जयस्वाल (११ महिने) यांचा जागीच मृत्यू झाला, तर संतराम जयस्वाल (७०) यांना रुग्णालयात उपचारासाठी नेत असताना त्यांचाही मृत्यू झाला. याशिवाय राधिका जयस्वाल (३०) आणि अंशिका जयस्वाल (७) गंभीर जखमी झाले असून त्यांना पुढील उपचारासाठी सायन रुग्णालयात हलविण्यात आले आहे, तर सुनीता जयस्वाल (३८), शिवम जयस्वाल (१४), सतीश जयस्वाल (२४) आणि सुशी जयस्वाल (१५) यांच्यावर शहापूर उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

# गौराईच्या स्वागतासाठी घरोघरी तयारी

**अलिबाग : प्रतिनिधी**

गणरायाच्या आगमनानंतर आता गौराईच्या स्वागताची लगबग सुरू झाली आहे. रायगडात घरोघरी गुरुवारी (दि. १७) गौराईचे आगमन होणार आहे.

गौराईला माहेरवाशीण मानण्याची कोकणातील परंपरा असल्याने तिच्या स्वागताची तयारी मोठ्या उत्साहाने केली जाते. कुटुंबाच्या परंपरेनुसार विविध पद्धतीने गौराईची स्थापना आणि पूजा केली जाते. गौराईच्या स्वागताची तयारी सुरू झाली आहे. सजावट आणि पूजेची तयारी अंतिम टप्प्यात आली असून बाजारपेठांमध्ये गौराईचे मुखवटे, अवयव, पावले आणि पूजेच्या साहित्याच्या खरेदीसाठी महिलांची गर्दी होत आहे.



रायगडातील पेणसह अलिबाग, पनवेल, माणगाव, रोहा, महाड, श्रीवर्धन, म्हसळा आणि इतर तालुक्यांतील बाजारपेठांमध्ये गौराईच्या साहित्याची खरेदी सुरू झाली आहे. विविध आकार आणि प्रकारचे मुखवटे, पावले, हात-पायांचे अवयव तसेच सजावटीचे साहित्य बाजारात उपलब्ध झाले आहे.

गौराईच्या पूजेच्या पद्धतींमध्येही विविधता पाहायला मिळते. काही कुटुंबांमध्ये मुखवट्यांची पूजा केली जाते, तर काही ठिकाणी उभ्या गौरींची स्थापना केली जाते. काही भागांत बसलेल्या गौरींची पूजा करण्याची, तर काही कुटुंबांमध्ये नदी किंवा समुद्रातून आणलेल्या खड्यांची पूजा करण्याची परंपरा आजही जपली जाते. गणेशोत्सवाच्या भक्तिमय वातावरणात आता गौराईच्या स्वागताचादेखील उत्साह रंगू लागला आहे.

## दिघी येथे ग्रीनफिल्ड जहाज बांधणीसाठी सामंजस्य करार

**मुंबई** : रायगड जिल्ह्यातील दिघी येथे प्रस्तावित ग्रीनफिल्ड जहाज बांधणी औद्योगिक समूहामध्ये प्रमुख जहाज बांधणी केंद्र म्हणून सहभागी होण्यासाठी नॅशनल शिपबिल्डिंग अँड हेवी इंडस्ट्रीज पार्क महाराष्ट्र लि. (एनशिपएमएल) आणि माझगाव डॉक शिपबिल्डर्स लि. (एमडीएल) यांच्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत सामंजस्य करार करण्यात आला. या करारामुळे राज्यात ९० हजार रोजगार निर्माण होणार आहेत.

यावेळी मत्स्यव्यवसाय व बंदरेमंत्री नितेश राणे, बंदरे व परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, बिझनेस डेव्हलपमेंटचे सरव्यवस्थापक संजयकुमार सिंह, मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी उपस्थित होते. एमडीएलतर्फे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक कॅ. जगमोहन, तर एनशिपएमएलतर्फे व्यवस्थापकीय संचालक प्रदीप पी. यांनी करारावर स्वाक्षऱ्या केल्या. या प्रकल्पामुळे परिसरात विकास होणार आहे.






## संपादकीय

# जनसुरक्षा महत्त्वाची

गणेशोत्सवाच्या काळात आंदोलनाचा आग्रह धरण्यापूर्वी त्यातून निर्माण होणाऱ्या सार्वजनिक गैरसोयीचा आणि सुरक्षा व्यवस्थेवरील ताणाचा विचार होणे आवश्यक आहे. सणासुदीच्या दिवसांत जनसुरक्षेला कोणत्याही परिस्थितीत दुय्यम स्थान देता येणार नाही.

**एव्हाना अवघ्या राज्यभरात गणेशोत्सवाचा उत्साह टिपेला पोहोचला आहे. मुंबई व पुणे या दोन्ही शहरांमध्ये तर नेहमीच या काळात कायदा-सुव्यवस्था आणि वाहतूक व्यवस्थेवर मोठा ताण येत असतो. लाखो भाविकांची ये-जा, सार्वजनिक गणपतींच्या दर्शनासाठी होणारी गर्दी, अधुनमधुन निघणाऱ्या विसर्जनाच्या मिरवणुका आणि या साऱ्या परिस्थितीत आपत्कालीन सेवा सुरळीत राखण्यासाठी पोलीस आणि प्रशासन अहोरात्र काम करत असतात. अशा काळात एका मोठ्या आंदोलनामुळे संपूर्ण व्यवस्थेवर अधिकचा ताण निर्माण होणे ही निश्चितच चिंतेची बाब आहे. मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील मुंबईच्या दिशेने रवाना होण्याच्या भूमिकेवर ठाम असल्याचे बुधवारी संध्याकाळपर्यंत दिसत होते. आझाद मैदानात आंदोलन करण्यासाठी त्यांनी परवानगी मागितली होती. पोलिसांनी यापूर्वी त्यांना ही परवानगी नाकारली असून नव्या अर्जाची प्रक्रिया सुरू असल्याचे समजते. इथे प्रश्न कुणाच्या आंदोलनाच्या अधिकाराचा नसून त्यासाठी निवडलेल्या वेळेचा आणि ठिकाणाचा आहे. नेमकी गणेशोत्सवाच्या काळात त्यांची ही आंदोलनाची मागणी पुढे आल्याने मुंबईतील गर्दी, वाहतूक आणि सुरक्षेचा प्रश्न अधिक महत्त्वाचा ठरला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची यासंदर्भातील भूमिका अतिशय सुस्पष्ट अशी आहे. मुंबई आणि पुणे या दोन्ही शहरांत गणेशोत्सव हा खूपच मोठा सण असतो. महाराष्ट्राची ओळख असलेल्या या उत्सवात कोणतेही विघ्न येऊ नये अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे. कायदा आणि सुव्यवस्था राखणे ही पोलिसांची जबाबदारी असल्याचेही त्यांनी स्पष्टपणे अधोरेखित केले आहे. मुख्यमंत्र्यांच्या या भूमिकेत आंदोलनाशी संबंधित कोणत्याही मुद्यावर भाष्य नसून निव्वळ आंदोलनाची वेळ आणि त्याचा सर्वसामान्य नागरिकांवर होणारा परिणाम याकडे त्यांनी लक्ष वेधले आहे. सरकारने या प्रश्नी चर्चेची दारे कायम उघडी ठेवली आहेत. गणेशोत्सवाच्या काळात आंदोलन नको. जरांगे यांनी उपचार घ्यावेत. तब्येत चांगली असणेही आवश्यक आहे. आंदोलन नंतरही करता येईल असेही फडणवीस यांनी बुधवारी म्हटले आहे. गणेशोत्सवाच्या काळात मुंबईतील परिस्थिती नेहमीपेक्षा निश्चितच वेगळी असते. रस्त्यांवरील प्रचंड गर्दीमुळे वाहतुकीचे मार्ग बदलले जातात. पोलिसांचे मोठे मनुष्यबळ गर्दीचे नियंत्रण, वाहतूक नियमन आणि सुरक्षा व्यवस्थेसाठी तैनात असते. अशातच मराठा आंदोलक मोठ्या संख्येने शहरात दाखल झाल्यास प्रशासनासमोर अतिरिक्त आव्हान उभे राहील. आंदोलनासाठी येणाऱ्या लोकांची सुरक्षितता हीदेखील प्रशासनाचीच जबाबदारी असते. परिणामी गणेशोत्सवाच्या ठिकाणी तैनात यंत्रणेवरील ताण आणखी वाढू शकतो. या साऱ्याचा परिणाम अंतिमतः सर्वसामान्य मुंबईकरांच्या सुरक्षेवर होईल. गणेशोत्सव हा आनंदाचा उत्सव आहे. लाखो नागरिक तो निर्भयपणे आणि उत्साहाने साजरा करू शकतील याची खबरदारी घेणे ही शासनाची जबाबदारी आहे. त्यामुळे सणासुदीच्या काळात प्रशासनावर अनाठायी अतिरिक्त ताण येईल आणि त्याचा फटका सर्वसामान्य नागरिकांना बसेल, अशी परिस्थिती निर्माण होऊ नये ही अपेक्षा रास्तच आहे. कोणताही प्रश्न कितीही महत्त्वाचा असला तरी नागरिकांची सुरक्षितता त्याहून अधिक महत्त्वाची आहे हे कुणालाही नाकारता येणार नाही. गणेशोत्सव निर्विघ्न, सुरक्षित आणि शांततेत पार पडणे याला याक्षणी प्राधान्य दिले जाणे म्हणूनच रास्त वाटते.**

# आधुनिक भारताचे विकासपुरुष पंतप्रधान नरेंद्र मोदी

२१व्या शतकातील भारताच्या राजकीय, आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक पटलावर आपल्या कर्तृत्वाचा आणि कणखर नेतृत्वाचा गडद ठसा उमटवणारे जागतिक व्यक्तिमत्त्व म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी. २०१४मध्ये ऐतिहासिक बहुमताने सत्तेवर आल्यापासून ते आजतागायत त्यांच्या कारकिर्दीने भारताला एका नव्या आत्मविश्वासाने आणि अभूतपूर्व वेगाने प्रगतीच्या शिखराकडे नेण्याचे काम केले आहे. 'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास आणि सबका प्रयास' हा मूलमंत्र घेऊन काम करणाऱ्या पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने केवळ अंतर्गत सुधारणाच केल्या नाहीत, तर जागतिक स्तरावरही आपले एक वेगळे स्थान निर्माण केले आहे.



### राजकीय प्रवास, नेतृत्वशैली आणि लोकशाहीचा नवा इतिहास

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा राजकीय प्रवास हा अत्यंत संघर्षमय आणि प्रेरणादायी राहिलेला आहे. एका सामान्य कुटुंबातून येऊन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारक म्हणून त्यांनी आपल्या सार्वजनिक जीवनाची सुरुवात केली. त्यानंतर भारतीय जनता पक्षात त्यांनी संघटनात्मक पातळीवर मोठे काम केले आणि पक्षाला मजबूत आधार दिला. २००१ ते २०१४ या प्रदीर्घ काळात त्यांनी गुजरातचे सलग चार वेळा मुख्यमंत्री म्हणून धुरा सांभाळली. त्यांच्या कार्यकाळातील 'गुजरात मॉडेल'ने प्रशासकीय गतिशीलता आणि आर्थिक विकासाचे नवीन निकष प्रस्थापित केले, ज्यामुळे संपूर्ण देशाचे लक्ष त्यांच्याकडे वेधले गेले. २०१४च्या लोकसभा निवडणुकीत भाजपने त्यांच्या कणखर नेतृत्वाखाली ऐतिहासिक विजय मिळवला आणि तीन दशकांनंतर देशात पूर्ण बहुमताचे सरकार स्थापन झाले. त्यानंतर २०१९मध्ये देशवासीयांनी त्यांच्यावर आधीपेक्षाही मोठा विश्वास दाखवला. २०२४च्या सार्वत्रिक निवडणुकीतही जनतेने त्यांच्या नेतृत्वावर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब केले. पं.जवाहरलाल नेहरू यांच्यानंतर भारताच्या इतिहासात सलग तीन वेळा पंतप्रधानपदाची शपथ घेणारे नरेंद्र मोदी हे देशातील दुसरे नेते ठरले आहेत. त्यांची निर्णयक्षमता, अहोरात्र काम करण्याची ऊर्जा, शिस्त आणि थेट जनतेशी संवाद साधण्याची 'मन की बात'सारखी शैली ही त्यांच्या अथांग लोकप्रियतेचे मुख्य गमक आहे.

### आर्थिक सुधारणा, 'मेक इन इंडिया' आणि आत्मनिर्भर भारत

पंतप्रधान मोदी यांच्या कारकिर्दीत भारताने आर्थिक क्षेत्रात जी झेप घेतली, तिची दखल संपूर्ण जगाला घ्यावी लागली आहे. २०१४मध्ये भारत जगातील नाजूक अर्थव्यवस्थांच्या यादीत होता, परंतु गेल्या काही वर्षांतील आर्थिक शिस्त आणि सुधारणांमुळे भारताने ब्रिटनला मागे टाकत जगातील पाचवी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याचा मान मिळवला.

### वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) रचना

स्वातंत्र्यानंतरची सर्वात मोठी कर सुधारणा मानली गेलेली 'एक देश, एक कर' ही संकल्पना प्रत्यक्षात आणत त्यांनी देशातील क्लिष्ट करप्रणाली सुलभ केली आणि करचुकवेगिरीला मोठा लगाम लावला.

* विमुद्रीकरण (नोटबंदी) : काळ्या पैशावर, बनावट नोटांवर आणि दहशतवादाच्या आर्थिक रसदीवर प्रहार करण्यासाठी २०१६ मध्ये घेतलेला हा एक अत्यंत धाडसी आणि राजकीय जोखीम असलेला निर्णय होता.
* मेक इन इंडिया आणि पीएलआय योजना : भारताला उत्पादनाचे जागतिक केंद्र बनवण्यासाठी 'मेक इन इंडिया' अभियान सुरू केले गेले. उत्पादन-आधारित प्रोत्साहन योजनेमुळे आज भारतात मोबाईल निर्मिती, इलेक्ट्रॉनिक्स आणि संरक्षण साहित्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर वाढले आहे.
* डिजिटल इंडिया आणि यूपीआय क्रांती : भारताने तंत्रज्ञान क्षेत्रात केलेली प्रगती थक्क करणारी आहे. आज जगातील एकूण रिअल-टाइम डिजिटल व्यवहारांपैकी ४० टक्क्यांहून अधिक व्यवहार एकट्या भारतात होतात. गल्लीबोळातील लहान भाजी विक्रेत्यापासून ते मोठ्या मॉलपर्यंत 'यूपीआय' चा वापर हे मोदी सरकारच्या डिजिटल क्रांतीचे सर्वात मोठे आणि दृश्य यश आहे.

### पायाभूत सुविधांचा अभूतपूर्व विकास

पंतप्रधान मोदी यांच्या कार्यकाळाला 'पायाभूत सुविधांचा सुवर्णकाळ' म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. 'पीएम गतिशक्ती राष्ट्रीय मास्टर प्लॅन'च्या माध्यमातून रेल्वे, रस्ते, विमानतळ, बंदरे आणि जलमार्गांचे जाळे वेगाने विस्तारत असून देशांतर्गत लॉजिस्टिक खर्च कमी करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

* महामार्ग आणि एक्स्प्रेस वे निर्मिती : देशात दररोज किलोमीटरच्या हिशोबाने हायवे बांधणीचा वेग विक्रमी पातळीवर पोहोचला आहे. दिल्ली-मुंबई एक्सप्रेस वे, पूर्व-पश्चिम कॉरिडॉर आणि महाराष्ट्रातील समृद्धी महामार्ग यांसारख्या भव्य प्रकल्पांमुळे दळणवळण सुलभ झाले आहे.
* रेल्वेचे आधुनिकीकरण आणि वंदे भारत : भारतीय रेल्वेचा चेहरामोहरा पूर्णपणे बदलला जात आहे. पूर्णपणे स्वदेशी बनावटीच्या, अत्याधुनिक आणि सेमी-हायस्पीड 'वंदे भारत' ट्रेन्स आज देशाच्या कानाकोपऱ्यात धावत आहेत. यासोबतच रेल्वे स्थानकांचे पुनर्विकास (अमृत भारत स्टेशन योजना) आणि मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाचे कामही वेगाने प्रगतीपथावर आहे.
* नागरी उड्डाण आणि उडान योजना : हवाई चप्पल घालणारा सामान्य माणूसही विमानाने प्रवास करू शकला पाहिजे या विचारातून सुरू झालेल्या उडान योजनेमुळे देशातील सक्रिय विमानतळांची संख्या दुप्पट झाली असून प्रादेशिक कनेक्टिव्हिटी कमालीची वाढली आहे.

### सामाजिक कल्याण, अंत्योदय आणि सर्वसमावेशक विकास

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संपूर्ण धोरणांच्या केंद्रस्थानी समाजातील शेवटच्या घटकाचा विकास (अंत्योदय) हाच विचार राहिलेला आहे. गरिबांचे सक्षमीकरण करण्यासाठी त्यांनी 'थेट लाभ हस्तांतरण' (डीबीटी)चा वापर करून भ्रष्टाचाराला पूर्णपणे चाप लावला.

* प्रधानमंत्री जन धन योजना : या योजनेच्या अंतर्गत कोट्यवधी गरिबांची शून्य शिल्लक बँक खाती उघडून त्यांना मुख्य आर्थिक प्रवाहात आणले गेले. यामुळे शासकीय अनुदानाचा पैसा थेट लाभार्थ्यांच्या खात्यात जमा होऊ लागला, ज्यामुळे मध्यस्थांची दुकानदारी बंद झाली.
* आयुष्मान भारत योजना : ही जगातील सर्वात मोठी आरोग्य विमा योजना आहे. याअंतर्गत देशातील ५० कोटींहून अधिक गरीब आणि गरजू नागरिकांना प्रतिवर्ष ५ लाख रुपयांपर्यंतचे मोफत वैद्यकीय उपचार मिळण्याची खात्री मिळाली आहे.
* उज्वला आणि स्वच्छ भारत अभियान : ग्रामीण भागातील कोट्यवधी महिलांना मोफत गॅस कनेक्शन देऊन त्यांना लाकडाच्या धुरापासून मुक्ती दिली तसेच देशात कोट्यवधी शौचालयांची उभारणी करून महिलांना सन्मान आणि सुरक्षा मिळवून दिली.
* प्रधानमंत्री आवास योजना आणि जल जीवन मिशनः 'हर घर जल' अभियानांतर्गत ग्रामीण भागातील करोडो घरांमध्ये नळाने शुद्ध पिण्याचे पाणी पोहोचवले गेले आहे. तसेच, प्रत्येकाला हक्काचे पक्के घर देण्याचे स्वप्न 'पीएम आवास' योजनेतून पूर्ण होत आहे.

### राष्ट्रीय सुरक्षा आणि कणखर परराष्ट्र धोरण

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने 'मवाळ किंवा संरक्षणात्मक' भूमिकेकडून 'आक्रमक आणि चोख प्रत्युत्तर देणाऱ्या' सामरिक धोरणाचा अंगीकार केला. राष्ट्रीय सुरक्षेच्या बाबतीत कोणतीही तडजोड न करण्याचा संदेश त्यांनी जगाला दिला.

* सर्जिकल आणि एअर स्ट्राईक : उरी आणि बालाकोट येथील दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने सीमेपार जाऊन शत्रूच्या घरात घुसून केलेले सर्जिकल आणि एअर स्ट्राईक हे मोदी सरकारच्या कणखर राजकीय इच्छाशक्तीचे आणि बदललेल्या भारताचे जिवंत उदाहरण आहे.
* कलम ३७०चा ऐतिहासिक निर्णय : ऑगस्ट २०१९मध्ये जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा देणारे कलम ३७० रद्द करून, तिथे भारतीय संविधानाची पूर्ण अंमलबजावणी सुनिश्चित करण्यात आली. हा निर्णय भारताच्या अखंडतेसाठी अत्यंत महत्त्वाचा मैलाचा दगड ठरला.
* जागतिक मुत्सद्देगिरी आणि 'ग्लोबल साऊथ'चे नेतृत्व : पंतप्रधान मोदी यांच्या वैयक्तिक संबंधांमुळे आणि मजबूत परराष्ट्र धोरणामुळे आज अमेरिका, रशिया, युरोप आणि आखाती देशांशी भारताचे संबंध अत्यंत दृढ झाले आहेत. भारताने यशस्वीरित्या भूषवलेले जी-२०चे अध्यक्षपद, 'क्वाड'मधील सक्रिय सहभाग आणि जागतिक संकटांच्या काळात (उदा. कोविड महामारीदरम्यान व्हॅक्सीन मैत्री) भारताने केलेली मदत यामुळे भारताचा आवाज आज जागतिक व्यासपीठावर आदराने ऐकला जातो.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आतापर्यंतच्या कारकिर्दीचे मूल्यमापन केल्यास असे दिसून येते की, त्यांनी भारताला केवळ आर्थिक आणि लष्करी दृष्ट्याच मजबूत केले नाही, तर १४० कोटी भारतीयांच्या मनात 'आपण जगात सर्वश्रेष्ठ होऊ शकतो' हा आत्मविश्वास आणि राष्ट्रप्रेमाची भावना जागृत केली. 'विकसित भारत २०४७' हे भव्य स्वप्न उराशी बाळगून त्यांच्या तिसऱ्या कार्यकाळात देश अधिक वेगाने आणि मजबुतीने एका नव्या सुवर्णयुगाकडे पावले टाकत आहे.

(संकलन : टीम रामप्रहर)



## बदलते तंत्रज्ञान

# मोबाईलचा 'नॉईज कॅन्सलेशन मायक्रोफोन'

आजच्या आधुनिक आणि तंत्रज्ञानाच्या युगात मोबाईल फोन हा मानवी जीवनाचा अविभाज्य घटक बनला आहे. मोबाईल फोन वापरत नाही, असा जवळपास कोणीही नाही आणि आज स्मार्टफोन आपल्या सर्व गरजा पूर्ण करण्यास सक्षम आहेत. अन्न, वस्त्र आणि निवारा यानंतर आता मोबाईल ही माणसाची चौथी गरज बनण्याच्या मार्गावर आहे.





बराच वेळ आपण ज्या फोनवर घालवतो त्यातील काही फीचर्स किंवा त्यावर असणाऱ्या विविध टॅब्सचा वापर कशासाठी होतो हे बऱ्याच वेळा माहीत नसते. फोनच्या सर्वात खाली चार्जिंग होलच्या जवळ एक अगदी लहानसा होलही असतो. ते दिसायला खूप लहान असते, परंतु त्याचा उपयोग पाहिला असता तो प्रचंड मोठा आहे. पण बऱ्याच लोकांना या होलची स्मार्टफोन वापरात भूमिका काय आहे हे माहिती नसते. स्मार्टफोनमध्ये अशा अनेक गोष्टी आहेत, ज्या आपल्याला माहीतही नाहीत. त्यापैकीच एक म्हणजे स्मार्टफोनच्या सर्वात खाली चार्जिंग सॉकेट जवळ एक अगदी लहानसे होल असते. परंतु, आपल्याला बऱ्याच जणांना कदाचित माहिती नसेल की त्याचे महत्त्व किती अनन्यसाधारण असे आहे. बहुतांशी हे फोनच्या खालच्या बाजूला चार्जिंग कनेक्शनच्या अगदी शेजारी असते.

या छिद्राला 'नॉईज कॅन्सलेशन मायक्रोफोन' म्हणतात. जेव्हा आपण फोनवर बोलत असतो तेव्हा हे छिद्र आपल्या आजूबाजूला होणारा आवाज रोखण्याचे काम करते. हा लहानसा मायक्रोफोन तुम्ही जर फोनवर बोलताना गोंगाटात असाल तर मागून येणारा संपूर्ण आवाज कॉलवर असणाऱ्या व्यक्तीपर्यंत पोहोचू देत नाही. बऱ्याच वेळा आपण ट्रॅफिकमध्ये असताना फोनवर बोलत असतो.

अशावेळी आपल्या आजूबाजूला अनेक प्रकारचा आवाज मोठ्याने चालू असतो, परंतु तरीसुद्धा आपल्या आजूबाजूचा आवाज पलीकडच्या आपण ज्या व्यक्तीशी बोलतो त्याला ऐकू न येता फक्त आपलाच आवाज त्याला व्यवस्थित ऐकायला जातो. जेव्हा आपण अशावेळी फोनवर बोलत असतो तेव्हा आपल्या आजूबाजूला चालू असणारा आवाज थांबवण्याचे महत्त्वाचे काम या होलच्या माध्यमातून केले जाते. अशा पद्धतीने स्मार्टफोनच्या खाली असलेल्या या लहानशा होलचे मोठे कार्य आहे.

# आशयघन काव्याचे जनक वसंत बापट



## निमित्त

वसंत बापट हे सुप्रसिद्ध मराठी कवी, वक्ते, कलावंत होते. त्यांचा आज स्मृतीदिन आहे. बापट यांचा जन्म २५ जुलै १९२२ रोजी सातारा जिल्ह्यातील कराड याठिकाणी झाला. पुण्याच्या स.प. महाविद्यालयातून एम.ए.(१९४८). त्यानंतर मुंबईतील 'नॅशनल कॉलेज' आणि 'रामनारायण रुईया कॉलेज' या महाविद्यालयांतून मराठी आणि संस्कृत विषयांचे प्राध्यापक होते. १९७४ पासून मुंबई विद्यापीठातील गुरुदेव टागोर अध्यासनाचे प्राध्यापक होते. साहित्य अकादमीचे ते सदस्य होते.


लहानपणापासून बापटांवर राष्ट्र सेवा दलाचे आणि साने गुरुजींच्या सहवासाचे संस्कार झाले. बिजली (१९५२) या त्यांच्या पहिल्या काव्यसंग्रहावर या संस्कारांचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो. 'सेतु' (१९५७), 'अकरावी दिशा' (१९६२), 'सकीना' (१९७२) आणि 'मानसी' (१९७७) हे त्यांचे बिजलीनंतरचे काव्यसंग्रह. बिजली ते मानसीपर्यंत त्यांच्या कवितेचा झालेला प्रवास कवी म्हणून झालेल्या त्यांच्या विकासाचा द्योतक आहे. बिजलीनंतरच्या काव्यसंग्रहांतून त्यांच्या अनुभवांचे क्षेत्रही उत्तरोत्तर अधिकाधिक विस्तारत गेल्याचे दिसते. संस्कृत आणि इंग्रजी कवितेचा प्रभावही या कवितेवर दिसून येतो. सामाजिक विषमता आणि अन्याय यांच्या तीव्र जाणिवेबरोबरच यौवनाचा अभिजात डौल, निसर्गाच्या विभ्रम-विलासांतून खट्याळ शृंगार व्यक्तविण्याची प्रवृत्ती, लावणीसारख्या जुन्या काव्यप्रकाराचे पुनरुज्जीवन करण्याचा रसिक प्रयत्न यांचा प्रत्यय त्यांच्या बिजलीनंतरच्या कवितेत येतो. त्यांच्या कवितेचे परिपक्व रूप मानसीमध्ये विशेषत्वाने जाणवते. या काव्यसंग्रहातील त्यांची कविता मितभाषी, परंतु आशयदृष्ट्या अधिक गहन अशी आहे.


संस्कृतातील अभिजातता आणि नादवती शब्दकळा बंगालीतील-विशेषतः गुरुदेव टागोरांच्या कवितेतील-मानवतावाद आणि इंग्रजी कवितेतील स्वच्छंदतावादी प्रवृत्ती यांचे ठळक संस्कार बापटांच्या कवितेवर झालेले दिसतात. बापटांची अस्सल रसिकता आणि अतिंद्रिय अनुभवांना रूपरसगंधाचे लावण्य प्राप्त करून देणारी त्यांची बहुरंगी प्रतिमासृष्टी हेही त्यांच्या कवितेचे विशेष लक्षणीय पैलू होत. 'बारा गावचे पाणी' (१९६७) हा बापटांचा प्रवासवर्णनपर ग्रंथ आहे. या ग्रंथात भारताचा निसर्ग, चालीरीती, लोककला, यांचे प्रत्ययकारी चित्रण त्यांनी केले आहे. अशा या श्रेष्ठ कवीचे १७ सप्टेंबर २००२ रोजी निधन झाले.

वसंत बापट, मंगेश पाडगावकर आणि विंदा करंदीकर यांच्या संयुक्त काव्यदर्शनाचे अर्ध शतकाहून अधिक काळ देशभरात कार्यक्रम झाले. १९६९ मध्ये त्यांनी युगोस्लोव्हियातील आंतरराष्ट्रीय कविसंमेलनात भारताचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून सहभाग घेतला. आखाती देशात ही त्यांच्या काव्यदर्शनाचे कार्यक्रम झाले. सामाजिक, वाङ्मयीन आणि सांस्कृतिक क्षेत्रातील अनेक विषयांवर त्यांची व्याख्याने झाली. स इंडियन इन्स्टिटयूट ऑफ मास कम्युनिकेशन्स दिल्ली या संस्थेचे ते अनेक वर्षे सदस्य होते. 'चंगामंगा', 'अबडक तबडक', 'आम्ही', 'गरगर गिरकी', 'फिरकी', 'फुलराणीच्या कविता', 'परीच्या राज्यात' या त्यांनी लिहीलेल्या बालकविता. राष्ट्रसेवा दलातर्फे त्यांनी सादर केलेल्या 'महाराष्ट्र दर्शन', 'भारत दर्शन' ह्यांसारख्या यशस्वी कार्यक्रमातून तिचा प्रत्यय येतो.

(साभार इंटरनेट)

## चित्र रंगवा





## आरोग्य प्रहर

# चेहऱ्यावरील केस काढताय? लक्षात ठेवा 'या' काही गोष्टी

सौंदर्याची काळजी घेताना चेहऱ्यावरील नको असलेले केस हा एक महत्त्वाचा मुद्दा असतो. अनेक महिला हे केस पार्लरमध्ये जाऊन काढतात, तर काहीजणी घरीच फेशियल रेझर किंवा वॅक्सचा वापर करतात. मात्र, जर तुम्ही पहिल्यांदाच चेहऱ्यावरील केस काढणार असाल, तर काही गोष्टींचं भान राखणं खूप गरजेचं आहे. अन्यथा यामुळे त्वचेवर पुरळ, मुरुमं, किंवा ॲलर्जी सारख्या त्रासदायक समस्या होऊ शकतात...



### तुमच्या त्वचेचा प्रकार जाणून घ्या

प्रत्येकाची त्वचा वेगळी असते. कोरडी, तेलकट किंवा संवेदनशील. जर तुमची त्वचा संवेदनशील असेल, तर रेझर किंवा वॅक्सिंगमुळे जळजळ किंवा ॲलर्जी होण्याची शक्यता असते. त्यामुळे केस काढण्यापूर्वी त्वचेचा प्रकार ओळखणे अत्यावश्यक आहे.

### चेहरा स्वच्छ करून घ्या

केस काढण्यापूर्वी सौम्य फेसवॉशने चेहरा नीट धुऊन घ्या. त्वचेतील घाण आणि तेल हटवल्यामुळे छिद्र बंद होणार नाहीत आणि संसर्गाचा धोका कमी होतो. यानंतर हलकं जेल किंवा मॉइश्चरायझर वापरायला विसरू नका.

स्वच्छ आणि सुरक्षित साधनांचा वापर करा

रेझर, एपिलेटर किंवा वॅक्स जे काही वापरत असाल, ते स्वच्छ, नवीन आणि सुरक्षित असावं. गंजलेले किंवा जुने ब्लेड वापरल्यास कट्स आणि इन्फेक्शन होण्याचा धोका असतो. वॅक्स वापरताना त्याचे तापमान योग्य आहे का, हेही तपासा.

### मॉइश्चरायझरचा वापर आवश्यक

केस काढल्यानंतर त्वचा थोडी संवेदनशील होते, त्यामुळे हलकं, सुगंधरहित मॉइश्चरायझर लावा. यामुळे जळजळ होणार नाही आणि त्वचेला थंडावा मिळतो. केस काढल्यानंतर किमान ६ ते ८ तास मेकअप टाळावा.

### उन्हापासून संरक्षण करा

केस काढल्यानंतर त्वचा अधिक संवेदनशील होते, त्यामुळे थेट सूर्यप्रकाशात जाणं टाळा किंवा सनस्क्रीनचा वापर करा. तसेच, वारंवार केस काढणं टाळा - यामुळे त्वचा पातळ होण्याची शक्यता असते. १५ ते २० दिवसांच्या अंतराने ही प्रक्रिया करणं योग्य ठरतं. एकंदर चेहऱ्यावर काहीही करताना आधी विचार करूनच मग कार्यवाही करणे आवश्यक आहे.

# वारस नोंदींचा मार्ग मोकळा

## सुजित बारसकर यांच्या पाठपुराव्याला मोठे यश

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील इनामी जमिनींवरील कुळ, वनहक्क पट्टेधारक आणि महाराष्ट्र शासनाच्या वनजमिनी कसणाऱ्या शेतकऱ्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या वारसांची नोंद ७/१२ उताऱ्यावर व्हावी यासाठी भाजप किसान मोर्चा दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष सुजित सदाशिव बारसकर यांनी केलेल्या पाठपुराव्याला अखेर मोठे यश आले आहे. त्यांच्या प्रयत्नांमुळेच तालुक्यातील शेतकऱ्यांचा अनेक वर्षांपासून प्रलंबित वारस नोंदींचा गंभीर प्रश्न मार्गी लागला आहे.





सुजित बारसकर यांच्या पाठपुराव्याची दखल घेत तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय सुधागडचे तहसीलदार उत्तम कुमार यांनी सुधागड तालुक्यातील सर्व मंडळ अधिकारी आणि ग्राम महसूल अधिकारी यांना निर्देश दिले आहेत. या आदेशानुसार आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करून वारस नोंदींची नियमोचित कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. संपूर्ण प्रक्रियेसाठी भाजप दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष खासदार धैर्यशील पाटील, सरचिटणीस सतीश धारप व भाजप ज्येष्ठ नेते प्रकाश देसाई यांनी मार्गदर्शन केले. बारसकर यांनी १ ऑगस्ट २०२६ रोजी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे अर्ज सादर करून या प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधले होते.

अर्जाची दखल घेत उपविभागीय अधिकारी, रोहा विभाग यांच्या पत्राच्या संदर्भानुसार सुधागड-पाली तहसीलदारांनी पावले उचलली आहेत. बारसकर यांनी अर्जात मागणी केली होती की, शेतकऱ्यांच्या मृत्यूनंतर वारसांची नोंद आवश्यक कागदपत्रे व शासनाच्या प्रचलित कायदे-नियमांनुसार ७/१२ उताऱ्यावर त्वरित केली जावी. प्रलंबित वारस नोंदींचा निपटारा करण्यासाठी विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात यावे. सुजित बारसकर यांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी घेतलेल्या या पुढाकारामुळे तालुक्यातील शेतकरी वर्गातून त्यांचे आभार मानले जात आहेत.

### आदिवासी बांधवांसाठी ऐतिहासिक निर्णय

वनहक्क जमिनींसाठी स्वतंत्र सातबारा वनहक्क कायद्यांतर्गत जमिनी मिळालेल्या आदिवासी व पारंपरिक वननिवासी बांधवांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी सरकारने स्वतंत्र 'गाव नमुना ७-ई' (सातबारा) व 'गाव नमुना १२-ई' लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. महसूलमंत्री बावनकुळे यांनी विधान मंडळ सभागृहांत ही घोषणा केली. वनपट्टाधारकांच्या नावाची महसूल दप्तरी नोंद होऊन शासकीय योजना, पीक कर्ज, विम्याचा मार्ग मोकळा झाला.

# एक गाव, एक गणपती !

## साले गावात जपली जाते एकोप्याची परंपरा

**अलिबाग : प्रतिनिधी**

कोकणातील घरोघरी गणरायाचे आगमन झाले आहे. सर्वत्र सध्या गणेशोत्सवाची धूम सुरू झाली आहे, परंतु रायगड जिल्ह्याच्या माणगाव तालुक्यातील साले गावातील गणेशोत्सव आगळाच. जवळपास सव्वाशे उंबऱ्यांच्या या गावातील एकाही घरात गणेश चतुर्थीच्या दिवशी गणरायाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना केला जात नाही, मात्र येथील ग्रामस्थ एक दिवसाचा गणेशोत्सव मोठ्या आनंदात आणि भक्तीमय वातावरणात साजरा करतात.

गणेश चतुर्थीच्या दिवशी गावातील सर्व ग्रामस्थ गावातील शिवगणेश मंदिरात जमतात. मंदिरात भजन, पूजन होते. नवस बोलले जातात. पूर्वी बोललेले नवस फेडले जातात. मंदिरातून गणपतीच्या पालखीची वाजतगाजत मिरवणूक निघते. मंदिराच्या शेजारीच असलेल्या गंगातलावातून या पालखीची वाजतगाजत मिरवणूक काढली जाते. कंबरभर पाण्यातून ही मिरवणूक तलावाच्या दुसऱ्या बाजूला येते. सोबत भजनी मंडळ असते.

त्यानंतर या पालखीची वाजतगाजत गावातून मिरवणूक निघते. घरोघरी पालखीचे पूजन होते. गणरायाची मनोभावे पूजा केली जाते. त्यानंतर पुन्हा मंदिरात या पालखी मिरवणुकीची सांगता होते. हा आगळावेगळा गणेशोत्सव नेमका कधी आणि कसा सुरू झाला हे आजच्या पिढीलाही माहिती नाही, मात्र वर्षानुवर्षे सुरू असलेली ही परंपरा आजच्या पिढीनेही जपली आहे.



घरोघरी गणरायाचे आगमन होत नसले तरी एक दिवसाच्या या उत्सवासाठी गावात मुंबईकर चाकरमानी हमखास हजेरी लावतात. माहेरवाशिणी, महिलावर्गही मोठ्या संख्येने या उत्सवात सहभागी होत असतो. केवळ गावातीलच लोक नाही तर पंचक्रोशीतील भाविकही हा सोहळा अनुभवण्यासाठी साले गावात येतात. एक गाव एक संकल्पना रूजवण्याचे प्रयत्न अनेक वर्षांपासून होत आहेत.

> **ही परंपरा कधी सुरू झाली हे गावातील कुणालाच माहिती नाही, पण सर्व ग्रामस्थ एकत्र येऊन हा उत्सव साजरा करतात. त्यानिमित्ताने एक गाव, एक गणपती ही संकल्पनादेखील साकारली जाते. महत्त्वाचे म्हणजे गावच्या एकोप्याचे दर्शन घडते.**
> **-सत्यजीत भोनकर**, ग्रामस्थ

# कर्जत-मुरबाड महामार्गावर हिट अँड रन

## वृद्ध महिलेचा मृत्यू, चालक फरार

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत-मुरबाड राष्ट्रीय महामार्गावर लाखरन येथे एका ६५ ते ७० वर्षीय वृद्ध महिलेला धडक देऊन चालक गाडीसह पसार झाला आहे. या हिट अँड रन अपघातात जखमी झालेली महिला मृत्युमुखी पडली असून याबाबत कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

कर्जत-मुरबाड राष्ट्रीय महामार्गावर लाखरन येथे हिट अँड रनची धक्कादायक घटना घडली आहे. अज्ञात वाहनाने रस्त्यावरून जात असलेल्या एका वृद्ध महिलेला जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात वृद्ध महिलेचा जागीच मृत्यू झाला आहे. अपघातानंतर संबंधित वाहनचालकाने घटनास्थळी न थांबता वाहनासह पळ काढला. हा अपघात पहाटेच्या सुमारास घडला असावा, असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असून मृत महिलेची ओळख पटवण्याचे काम सुरू आहे तसेच अपघातास कारणीभूत ठरलेल्या वाहनाचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून तपास सुरू करण्यात आला आहे. मार्गावरील सीसीटीव्ही व इतर माहितीआधारे फरार वाहनाचा शोध सुरू आहे.



# एक्स्प्रेस वेवरील गॅस टँकर दुर्घटना

## देखावा ठरतोय जनजागृतीचे माध्यम

**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील आडोशी बोगद्यानजीक ३ फेब्रुवारी २०२६ रोजी झालेल्या प्रोपिलिन गॅस टँकरच्या भीषण अपघाताने संपूर्ण परिसर हादरला होता. अपघातानंतर झालेल्या गॅसगळतीमुळे महामार्गावरील हजारो वाहने, प्रवासी तसेच आजूबाजूच्या परिसराच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला होता. संभाव्य धोका अत्यंत मोठा असतानाही विविध यंत्रणांनी परिस्थिती संयमाने, कौशल्याने आणि अत्यंत काळजीपूर्वक हाताळल्याने मोठे संकट टळले होते.या थरारक प्रसंगाची स्मृती आणि त्यातून मिळालेला सुरक्षिततेचा संदेश गणेशोत्सवाच्या देखाव्यातून जनतेसमोर आणण्याचा अनोखा प्रयत्न हेल्प पाउंडेशनचे केमिकल एक्सपर्ट धनंजय गीध यांनी केला आहे.



आपल्या घरच्या गणपतीसाठी त्यांनी पत्नी रश्मी यांच्यासह कुटुंबीयांच्या सहकार्याने आडोशी बोगद्यानजीक घडलेल्या प्रोपिलिन गॅस टँकर अपघाताचा प्रतिकात्मक देखावा साकारला असून, या उपक्रमाची परिसरात चर्चा सुरू आहे.या दुर्घटनेच्या वेळी परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी धनंजय गीध यांनी पुढाकार घेत महत्त्वाची भूमिका बजावली होती. गॅसगळतीसारख्या अत्यंत संवेदनशील आणि धोकादायक परिस्थितीत तांत्रिक ज्ञान, प्रसंगावधान आणि समन्वयाचे महत्त्व या घटनेत प्रकर्षाने अधोरेखित झाले.या देखाव्यामागील भावना स्पष्ट करताना, "त्या प्रसंगी सर्व यंत्रणांनी केलेल्या प्रयत्नांमागे श्री गणेशाचा आशीर्वादच असावा," अशी श्रद्धा धनंजय गीध यांनी व्यक्त केली.

संकटातून सुखरूप बाहेर पडल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासोबतच, महामार्गावरील सुरक्षा आणि शिस्तीबाबत जनजागृती करण्याचा उद्देशही या उपक्रमामागे आहे.देखाव्यामध्ये आडोशी बोगद्याजवळील अपघाताचे चित्रण करण्याबरोबरच महामार्गावरील सुरक्षितता, वाहतूक शिस्त, आपत्कालीन परिस्थितीतील खबरदारी आणि हेल्प पाउंडेशनच्या कार्यपद्धतीची माहिती देण्यात आली आहे. संकटसमयी विविध यंत्रणांशी समन्वय साधून मदतकार्य कसे केले जाते, याचाही संदेश या माध्यमातून देण्यात आला आहे.खालापूर तालुक्याचे आपत्ती व्यवस्थापन प्रमुख तथा तहसीलदार अभय चव्हाण हे देखाव्याला भेट देणार आहेत. रसायनी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अभिजीत भुजबळ यांनी कर्मचाऱ्यांसह देखाव्याचे दर्शन घेऊन उपक्रमाचे कौतुक केले.

गणेशोत्सवातील हा देखावा केवळ एका भीषण अपघाताची आठवण करून देणारा नसून, सुरक्षा, शिस्त, तांत्रिक सज्जता, प्रशासकीय समन्वय आणि माणुसकीचे महत्त्व अधोरेखित करणारा जनजागृतीपर उपक्रम ठरत आहे.

# संदीप पाटील महावितरणच्या कार्यकारी संचालकपदी

**चौक : प्रतिनिधी**



महावितरणच्या अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या कार्यकारी संचालकपदी संदीप सुरेश पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या सर्वोच्च पदावर पोहोचणारे ते आगरी समाजातील पहिले आणि महाराष्ट्रातील सर्वात तरुण अधिकारी ठरले आहेत. त्यांच्या या ऐतिहासिक यशामुळे आगरी समाजाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला असून त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

पाटील मूळचे अलिबाग तालुक्यातील सांबरी येथील रहिवासी असून वयाच्या ४७व्या वर्षी त्यांनी ही उल्लेखनीय कामगिरी साध्य केली. कार्यकारी संचालकपदी निवड होण्यापूर्वी त्यांनी महावितरणमध्ये मुख्य अभियंता म्हणूनही अत्यंत यशस्वीपणे आणि कार्यक्षमतेने जबाबदारी सांभाळली होती.

# माथेरानमध्ये दीड दिवसांच्या गणरायाला भावपूर्ण निरोप

**माथेरान : बातमीदार**

गणेशोत्सवाची सुरुवात झाल्यानंतर मंगळवारी दीड दिवसांच्या गणरायाला भावपूर्ण वातावरणात निरोप देण्यात आला. माथेरानमध्ये दीड दिवसांच्या २८ घरगुती आणि एक सार्वजनिक अशा एकूण २९ गणेशमूर्तींचे विसर्जन शांततेत पार पडले. सोमवारी गणेशोत्सवाला धुमधडाक्यात सुरुवात झाली. त्यानंतर दीड दिवस गणरायाचा यथोचित पाहुणचार केल्यानंतर परंपरेनुसार टाळ-मृदंगाच्या गजरात विधिवत विसर्जन करण्यात आले.

सायंकाळी ५.३० नंतर गणेशभक्त आपल्या गणेशमूर्ती डोक्यावर घेऊन घराबाहेर पडले. त्यातच वरुणराजाने हजेरी लावल्याने वरुणराजाच्या अक्षता खांद्यावर घेत गणेशमूर्ती विसर्जनस्थळाकडे निघाल्या. येथील गणेशभक्त "गणपती बाप्पा मोरया, पुढल्या वर्षी लवकर या" असा जयघोष करीत होते. टाळ-मृदंगाचे स्वर आणि गणपती बाप्पाचा जयघोष यामुळे वातावरण भक्तिमय झाले होते.माथेरानमधील या गणेश विसर्जन मिरवणुकीत सामाजिक आणि धार्मिक एकोप्याचे दर्शन झाले. मुख्य बाजारपेठेतील जामा मशिदीसमोर स्थानिक मुस्लिम बांधवांकडून सर्व गणेशभक्तांना गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले.



चहा-कॉफीची व्यवस्थाही करण्यात आली होती. त्याचबरोबर विसर्जनस्थळी आकर्षक विद्युत रोषणाईही करण्यात आली होती.

# जैन धर्मीयांच्या पर्युषण पर्वाची मिरवणुकीने सांगता

**कर्जत : प्रतिनिधी**

जैन धर्मीयांच्या पर्युषण पर्वाची नुकतीच सांगता झाली. यानिमित्ताने कर्जत शहरातील जैन बांधवांनी भगवान महावीरांच्या मूर्तीची कर्जत शहरातून मिरवणूक काढली. जैन मंदिरात मिरवणुकीची सांगता करण्यात आली. यावेळी मोठ्या संख्येने जैन बांधव व भगिनी उपस्थित होत्या. जैन गणिवर्य कैवल्यजित विजयजी महाराज, साध्वीजी श्री कल्पनंदिताजी महाराज यांच्या नेतृत्वाखाली मिरवणूक काढण्यात आली.



मुनी परमजित विजयजी महाराज, मुनी दानपुण्य विजयजी महाराज, साध्वी ध्यानरुचिताश्री महाराज, साध्वी श्री चरणदृष्टीश्री महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत ही मिरवणूक जैन मंदिरापासून सुरू होऊन रेल्वे स्टेशन, पोस्टजवळून डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, मशिद मार्गे जैन मंदिर अशी काढण्यात आली.


**MAHAVITARAN**

**Invitation for bids on E-Tendering basis**

Publication of NIT in News Paper and MSEDCL Web site : 17/09/2026

| Sr. No. | Tender No. | Brifef Scope of work | Tender amount | Tender Fees | Tender Publication Date: |
|---|---|---|---|---|---|
| 1. | SE/PC/HR/ T-06 /2026-27 | Work of providing skilled outsourcing workers on contract basis at Pen Testing Division and Pen Circle office under Pen circle. | Rs. 82,55,000/- | 5000/- +18% GST | Submission of bid: 17/09/2026 To 27/09/2026 up to 23:55 Hrs. online |

For details visit website http://etender.mahadiscom.in/eatApp

PRO No. 94 — Superintending Engineer, MSEDCL, O&M Circle, Pen



**मारवा सहकारी गृहनिर्माण संस्था, मर्या.,**

भुखंड क्र. १, सेक्टर- २२, फेज- २, तळोजा, ता. पनवेल, जि. रायगड, नवी मुंबई- ४१०२०८

यांचे कडून नमूद सेवा सुविधांच्या निविदा मागविण्यात येत आहेत.

**निविदा सूचना**

| निविदा क्र. | निविदा तपशील | निविदा सादर करण्याचा कालावधी | निविदा सादर करण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|
| निविदा १ | ३२ चॅनेल एन व्ही आर सिस्टम- आउट डोअर सी.सी.टी.व्ही. कॅमेरे २४ | २४-०९-२०२६ | सोसायटी कार्यालय मारवा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. भूखंड क्र. १, सेक्टर-२२, फेज २, तळोजा, ता. पनवेल, नवी मुंबई. |
| निविदा २ | मोशन सेन्सर लाइट्स (स्टेरकेस एरिया) ४२५ | | |
| निविदा ३ | सौर ऊर्जा पॅनेल पुरवठा व उभारणी | | |
| निविदा ४ | १० x १५ फुट चे १० जाहिरात होर्डिंग स्ट्रक्चर तयार करणे व चालवणे. | | |
| निविदा ५ | जनरेटर सेट (ए. एम. सी.) | | |
| निविदा ६ | फायर सेफ्टी उपकरण (ए. एम. सी.) | | |
| निविदा ७ | कॅट वायर फेन्सिंग कंपाऊंड वॉल | | |
| निविदा ८ | चेहरा प्रमाणीकरण प्रवेशद्वार (बिल्डिंग गेट) | | |
| निविदा ९ | सोसायटी नावाचे एलईडी डिस्प्ले बोर्ड बसविणे | | |

दिनांक : १२/०९/२०२६

जा.क्र.: २३२/मारवा सह.गृह.सं.मर्या./२०२६-२०२७

आपला विश्वासू,

**सही/-**
**(सचिव)**
मारवा सहकारी गृहनिर्माण संस्था, मर्या.,


**श्री. विकास पवार, महसूल नायब तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी खालापूर यांचे न्यायालयात,**

क्र. मशा/ फौजदारी/कलम-५/वहिवाट/दावा क्र- / २०२५

प्रति,
१. श्री. कैलास रमाकांत पंडीत
२. श्री कृष्णा नारायण वाघरे,
रा. खालापूर, ता. खालापूर — **अर्जदार**

**विरुद्ध**

१. श्री. मोतीलाल पारसमल बोहरा,
रा. खालापूर, ता. खालापूर, जि. रायगड
२. श्री. विनोद जगदीशप्रसाद जाखोटीया,
रा. मैथिली निवास, पाटणकर वाडा खोपोली,
३. श्री. प्रदिपकुमार धोरजे,
रा.पी कुमार हाऊस पिकेडी, इस्टेट,
स.नं.२७/१/२/५,मुंबई बेंगलोर हायवे,
हॉलिडे इन हॉटेल समोर-पुणे ४११०४५
४. श्रीम. निता कैलास वाडेकर,
मु.पो.ता. खालापूर, जि.रायगड
५. श्री. अनिल लक्ष्मण ठाकूर,
मु.पो. जसखार, ता. उरण जि.रायगड ४००७०७
६. श्री. सत्यवान विठ्ठल काळसेकर,
बॅक ऑफ इंडिया जवळ
मु.पो.ता. खालापूर, जि. रायगड
७. श्री. जनार्दन वामन पाटील,
मु. महड, पो. ता. खालापूर, जि. रायगड
८. श्री. कौस्तुभ मधूसुदन जोशी,
साबाई नगर, मु.पो. ता. खालापूर
९. श्री. जयेश भाटे राग,
फॉरचुन रॉयल अपार्टमेंट, प्लॉट नं.९६१९७,
यूडीसीटी कॉलेट लाईन, इस्ट वडाळा मुंबई - ४०००३१
१०. श्री. राजन नेमीशरण गोयल,
गोयल ब्रदर्स आदित्य टॉवर्स ग्राउंड फ्लोअर,
झेनिथ कॉर्नर, खोपोली, ता. खालापूर
११. श्री. देवकिसन जोखोटीया,
मु. तुळशी कुंज, नेहरू गार्डन शेजारी,
शास्त्री नगर, खोपोली, ता.खालापूर-४१०२०३
१२. श्री. मोतीलाल पारसमल,
कॉचवाला बिल्डींग चौथा मजला, रु.नं.४४
पहिल परसीवाडा लेन सी. पी. टॅक जवळ,
जानूबाई देसाई रोड गिरगांव, मुंबई ४००००४
१३. श्री. नविनचंद्र विश्वनाथ घाटवल,
ए१ /८ गगणगिरी नगर सोसा. लक्ष्मी नगरजवळ,
खोपोली,ता. खालापूर- ४१०२०३
१४. श्री. संतोष दत्तात्रेय चौधरी,
रा. गजानन ट्रेडर्स, खालापूर फाटा
मु.पो.ता. खालापूर ४१०२०२
१६ श्री. स्वप्नील सुधाकर गायकर,
रा. धामणी, ता. खालापूर. जि. रायगड
१६. श्री. सागर लक्ष्मण झा
१७. श्री. मुरारी कुमार झा, रा. त्रिवेणी अपार्टमेंट,
पाटील आळी, मु.पो.ता. खालापूर, जि. रायगड
१८. श्रीम, समिक्षा संतोष चौधरी. रा. गजानन ट्रेडर्स,
खालापूर फाटा, मु.पो.ता. खालापूर, जि. रायगड
१९. संदेश रमेश पाटील,
२०. श्रीम. स्मिता संदेश पाटील
रा. कृपा अपार्टमेंट नं.१ तिसरा मजला,
प्लॉट नं. ३०१, विणानगर खोपोली,
वसंतराव देशमुख शाळेजवळ - ४१०२०३
२१. अनुजा सुनिल साखरे
२२. विलास नारायण शिंद
२३. जेठमल दंदाजी गेहलोत
२४.आशालता यशवंत गायकवाड
२५. किरण प्रभाकर आपटे,
२६. गणेश शंकर पवार
२७. रमेश एकनाथ देवरुखकर,
२८. कृष्णा पांडुरंग पवार
२९. मुकेश कुमार लालसाबू चौधरी
३०. संदेश रमेश पाटील
वरील २१ ते ३० या पत्त्यावर आढळत नाही. — **सामनेवाले**

---

**मामलेदार कोर्ट ॲक्ट १९०६ चे कलम ५ अन्वये कामकाज स्थळपाहणी करणेकामी उपस्थित राहणेबाबत.**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये, तक्रारदार श्री. कैलास रमाकांत पंडीत व श्री. कृष्णा नारायण वाघरे रा.खालापूर, ता.खालापूर यांनी या कार्यालयास दिनांक १९/०६/२०२५ रोजी तक्रार अर्ज सादर केला आहे.

सदर तक्रार अर्जामध्ये असे नमुद केले आहे की, मौजे खालापुर, ता. खालापुर, जि. रायगड येथील सर्व्हे नं. १०१/२/ अ व ९९/७ या मिळकती तक्रारदार श्री. कैलास रमाकांत पंडीत व श्री. कृष्णा नारायण वाघरे यांचे नावे आहे. जमीन मिळकतीमध्ये जाणेयेणेच्या रस्तात पोल टाकून तार कंपाऊड करुन रस्ता बंद केला असल्याबाबत अर्जात नमुद केले आहे. तरी शेतीकडे जाणे-येण्याचा पिढयान पिढयाचा रस्ता तात्काळ मोकळा करुन मिळणेबाबत विनंती केली आहे. प्रकरणी दिनांक १६/०३/२०२६ रोजी झालेल्या स्थळपाहणी दरम्यान सामनेवाले क्र. २ ते ३० यांच्या मिळकती असल्याचे दिसून आले आहे. त्याकामी वरील सर्व संबंधिता नोटीस देऊन दिनांक २४/०७/२०२६ रोजीचे सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सदर सुनावणीदरम्यान दिनांक ११/०८/२०२६ रोजीपर्यत अंतिम लेखी म्हणणे दाखल करणेसाठी मुदत देण्यात आली होती. दरम्यानेचे कालावधीत ॲड. श्री. जितेकर यांनी दिनांक ११/०८/२०२६ लेखी म्हणणे दाखल करुन स्थळ पाहणी झालेशिवाय निकाल देऊ नये अशी विनंती केली आहे.

तरी **सदर दाव्याचे अनुषंगाने दिनांक. ३०/०९/२०२६ रोजी, सकाळी / दुपारी ११.०० वाजता** स्थळ पाहाणी व स्थानिक चौकशी ठेवण्यात येत आहे. तरी सदर दिवशी व वेळी आपण अथवा आपल्यावतीने प्रधिकृत केलेला प्रतिनिधी उपस्थित राहावे.

ठिकाण : खालापूर
दिनांक : ०९/०९/२०२६

**सही/-**
**(विकास पवार)**
कार्यकारी दंडाधिकारी तथा
महसूल नायब तहसीलदार खालापूर

# गणेश दर्शन




आदर्श मित्रमंडळ, घरत आळी, अलिबाग


अलिबागचा राजा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, अलिबाग


रायगड जिल्हा परिषद सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, अलिबाग


अशोक पवार, पनवेल


गजानन बाळाराम घरत, खारकोपर, पनवेल


ईशान कल्याणकर, नेरुळ, से. १०


जगदीशबुवा भोईर, जय गणेश वसाहत,
नागाव, उरण


अमोल घायाळ, नवीन पनवेल


सरपंच विशाखा प्रशांत ठाकूर, खोपटे, उरण


प्रकाश जाधव, पाली


गजानन रापटे, आपटा, पनवेल


सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ जिल्हा
सामान्य रुग्णालय, अलिबाग


सन्मित्र गणेशोत्सव मंडळ,
बाजारपेठ, अलिबाग


सार्वजनिक बांधकाम विभाग,
अलिबाग, गणेशोत्सव मंडळ


शशिकांत भुवड, धनश्री सोसायटी,
पामबीच रोड, सानपाडा, नवी मुंबई


बालगणेश मित्र मंडळ,
पोलीस मुख्यालय, अलिबाग


उमेश पाटील, बारापाडा-पनवेल


दिनानाथ गावंड, बारापाडा


महादेव रामचंद्र दसवते,
आडघर, माणगाव


संतोष खडतर, साहिल खडतर, चेरवली, माणगाव


शिवाजी दत्ताराम दसवते, आडघर, माणगाव


महेंद्र नाचणकर, खारघर से.१२

# पुगाव येथे ज्वलनशील रसायन वाहून नेणाऱ्या कंटेनरचा अपघात

## सतर्क यंत्रणांमुळे संभाव्य मोठी दुर्घटना टळली

**माणगाव : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावर पुगाव येथे मंगळवारी पहाटेच्या सुमारास ज्वलनशील रसायनाची वाहतूक करणाऱ्या कंटेनरचा अपघात झाल्याने परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले. जेएनपीटीहून महाडच्या दिशेने जाणाऱ्या कंटेनरचा अपघात झाला. या कंटेनरमध्ये अत्यंत ज्वलनशील रसायन असल्याने परिस्थितीचे गांभीर्य अधिक वाढले. यावेळी वेळीच उपाययोजना करण्यात आली.

अपघातानंतर कंटेनरच्या मॅनहोलमधून रसायनाची गळती होत असल्याचे निदर्शनास आले. ज्वलनशील रसायनाची गळती आणि त्याच ठिकाणी सुरू असलेली महामार्गावरील वाहतूक लक्षात घेता कोणतीही ठिणगी, आग किंवा



अन्य दुर्घटना घडल्यास मोठा अनर्थ होण्याची शक्यता होती.

घटनेची माहिती मिळताच संबंधित यंत्रणांनी विलंब न करता घटनास्थळी धाव घेतली. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी आवश्यक सुरक्षात्मक उपाययोजना करण्यात आल्या. गळती नियंत्रित करण्यासाठी तातडीने प्रयत्न करण्यात आले, तसेच अपघातग्रस्त कंटेनरच्या परिसरात सुरक्षिततेची विशेष काळजी घेण्यात आली.

पुगाव येथील घटनेत संबंधित यंत्रणांनी वेळीच परिस्थिती ओळखून वाहतूक थांबवली आणि रसायनाची गळती नियंत्रित करण्यासाठी तातडीने उपाययोजना केली. त्यामुळे संभाव्य मोठी दुर्घटना टळल्याचे दिसून आले.

पुगाव येथील अपघाताने काही काळ काळजाचा ठोका चुकवला, मात्र प्रशासन, सुरक्षा यंत्रणा आणि संबंधित विभागांच्या सतर्कतेमुळे संभाव्य मोठा अनर्थ टळला. भविष्यात अशा घटना घडू नयेत आणि घडल्यास त्यावर अधिक वेगाने नियंत्रण मिळवता यावे यासाठी यंत्रणांनी प्रतिबंधात्मक उपाययोजनांना प्राधान्य देणे गरजेचे आहे.

### महामार्गावरील वाहतूक रोखली

*रसायनाच्या स्वरूपाचा संभाव्य धोका लक्षात घेऊन सुरक्षेच्या कारणास्तव मुंबई-गोवा महामार्गावरील वाहतूक काही काळ पूर्णपणे बंद ठेवण्यात आली. त्यामुळे महामार्गावर वाहनांच्या रांगा लागण्याची शक्यता निर्माण झाली होती, मात्र, दुर्घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन वाहतूक रोखण्याचा निर्णय घेण्यात आल्याने मोठा धोका टाळण्यास मदत झाली.*

# कर्जत सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे ९०व्या वर्षात पदार्पण

## कार्यक्रमांची रेलचेल, वार्षिक अहवालाचे प्रकाशन

**कर्जत : प्रतिनिधी**

आपल्या सामाजिक कार्याने प्रसिद्ध असलेल्या कर्जत सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने यंदा ९०व्या वर्षात पदार्पण केले आहे. या मंडळाने यावर्षी अनेक कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. स्थानिक तरुणांच्या कालगुणांना वाव देण्यासाठी मनाचे फोक असा आगळावेगळा कार्यक्रम होत असून राजकीय मंडळींसाठी कराओके गायनाची स्पर्धा होणार आहे.

कर्जत सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या वतीने वार्षिक अहवाल प्रकाशन आणि मंडळाच्या कार्याची माहिती देण्यासाठी करण्यासाठी पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. मंडळाचे अध्यक्ष आशिष गोखले, पदाधिकारी विवेक भागवत, रामराव पाटील, दीपक बडगुजर, बंटी लोवंशी आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

सुरूवातीला उपस्थितांच्या हस्ते अहवाल प्रकाशन करण्यात आले. त्यानंतर विवेक भागवत यांनी मंडळाच्या ९० वर्षाच्या काळाचा आढावा घेतला. १९३७ साली त्या काळातील प्रतिष्ठित मंडळी भाऊ जोशी वकील, दामू अण्णा वैद्य, बाबाराव वैद्य यांनी हे धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक आणि आरोग्य अशा चार तत्वावर चालणारे मंडळ स्थापन केले. हे मंडळ केवळ गणेशोत्सव काळासाठी मर्यादित नाही तर रुग्णवहिका ही मंडळाची ओळख आहे. रक्तदान शिबिरे, आरोग्य शिबिर, पारंपरिक शिवजयंती उत्सवही साजरा केला जातो.

यंदा वारी ही थीम असून आषाढ वारीची रचना मंडळाच्या कार्यकर्त्यांनी केली आहे. येथे प्रसादबुवा पाटील सलग ३६ वर्ष भजन सेवा देत आहेत. शालेय विद्यार्थ्यांसाठी गीता पठण बारावा अध्याय यावर पठण होणार आहे, तर चित्रकला स्पर्धाही रंगेल.

प्राणी फिलिंग म्हणजे काय याबद्दल प्राणी मित्र यांचे व्याख्यान तुमची ऊर्जा तुमचं आयुष्य या विषयावर सारिका बिवलकर यांचे व्याख्यान होणार आहे, तर मनाचे फोक आगळावेगळा कार्यक्रम कर्जतमधील कलाकारांच्या माध्यमातून साजरा होणार आहे. उषःकाल वाद्यवृंद आणि ईश्वर आरेकर स्मृती मंडळ यांच्या माध्यमातून होणार आहे.

अनोखा कार्यक्रम म्हणून कराओके स्पर्धा होणार असून राजकारणापलीकडील कलाकार गायक सहभागी होणार आहेत. इतर लोकांसाठी भजन स्पर्धा आहे. २५ सप्टेंबर रोजी डीजे मुक्त मिरवणूक निघणार असून पारंपरिक पद्धतीने ढोल पथक, लेझिम पथक असेल, अशी माहिती देण्यात आली.

# खोपोलीत महिलेची ऑनलाइन फसवणूक

**खालापूर : प्रतिनिधी**

खोपोलीतील एका ६७ वर्षीय महिलेला तुम्ही देशविरोधी लोकांच्या संपर्कात असून तुमच्या बँक खात्यातून पैशाचे व्यवहार होत असल्याचे बतावणी करत सायबर चोरट्याने सात लाखाची फसवणूक केली.

खोपोली शहरातील लौजी या ठिकाणी राहणाऱ्या महिलेला १ ते ४ सप्टेंबर या दरम्यान अज्ञाताने त्यांच्या मोबाईलवर व्हिडीओ कॉल करुन तो नाशिक पोलिसांच्या मुख्यालयातून अधिकारी बोलत असल्याचे सांगितले. महिलेला त्यानंतर व्हॉटसअॅपवर एक पत्रक पाठवून देशविरोधी लोकांच्या संपर्कात असल्याचे सांगत भीती घालण्यात आली तसेच या प्रकरणात मदत करण्याचे आश्वासन देत महिलेच्या पोस्टातील एफडी काढून ती रक्कम बँक खात्यात जमा करण्यास सांगितली. त्यानंतर सायबर चोरट्याने जमा केलेले सात लाख रुपये स्वतःच्या खात्यात वळते करून फसवणूक केली. याप्रकरणी तपास सुरू आहे.

# फार्मसी महाविद्यालयातील शिबिरात ३४ जणांचे रक्तदान

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत येथील कोकण ज्ञानपीठ फार्मसी महाविद्यालयात समर्पण रक्त केंद्र घाटकोपर आणि मेडिकल टेक्नॉलॉजिसट असोसिएशन ऑफ रायगड यांच्या सहकार्याने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात ३४ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी यांनी कर्जत-खालापूर तालुक्यात आयोजित केलेले ५४६वे रक्तदान शिबीर होते. याप्रसंगी अॅनेमिया अवेअरनेस प्रोग्रॅमसुद्धा घेण्यात आला.



अॅनेमिया अवेअरनेस प्रोग्रॅमचा शुभारंभ मेडिकल टेक्नॉलॉजिसट असोसिएशन ऑफ रायगडचे अध्यक्ष अबीद खान यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी, संस्थेचे खजिनदार झुलकरनैन डाभिया, महाविद्यालयीन विकास समिती सदस्य विजय मांडे, प्राचार्य डॉ. मोहन काळे, उपाध्यक्ष किरण ज्योती, सदस्य कल्पेश पटेल, अभिलाषा पटेल, सुमित जाधव, डॉ. अतुल त्रिपाठी, डॉ. निलोफर खान आदी उपस्थित होते.

डॉ. काळे यांनी उपस्थितांचे स्वागत करून प्रास्ताविकात रक्तदान व अनेमियाबद्दल मार्गदर्शन केले. आबिद खान, राजाभाऊ कोठारी यांनी रक्तदानाबद्दल मार्गदर्शन करून सर्वांनी रक्तदान करण्याचे आवाहन केले.

प्रा. अनिकेत इंदुलकर आणि संजय चौधरी यांनी सर्वप्रथम रक्तदान करून शिबिराचा शुभारंभ केला. रक्त संकलनाचे काम घाटकोपर येथील समर्पण रक्तकेंद्राचे डॉ. रमेश सिंग, आरोग्य सेविका शिला वाघमारे, दिपेश सरदार, श्रीराम नाईक, प्रदीप नितोरे, सुनिल निले आदींनी केले. सूत्रसंचालन प्रिया खापे यांनी केले.

उपक्रमावेळी डॉ. रुपाली येवले, प्रा. श्वेता दांगट, प्रा. मुक्ता गोचडे, तुषार घारे, सानिका जाधव, आदित्य अलिकडे, रूद्र जाधव, प्रणव जाधव, हेमंत जाधव, भाग्यश्री पोद्दार, राज गुप्ता, श्रद्धा वाघचौरे, भाविका सोनावणे, संजित घोडके, हर्षाली कल्पेश, ऋतुजा सावंत, प्रथम बाबरिया, साहिल चौधरी, असावरी चव्हाण आदी उपस्थित होते.

# माणगाव उपजिल्हा रुग्णालयात रुग्णांना फळवाटप

**माणगाव : प्रतिनिधी**

संपूर्ण मानवतेसाठी शांती, प्रेम आणि कल्याणाचा संदेश देणारे प्रेषित मुहम्मद हे सर्वांसाठी आहेत. या मानवतावादी विचाराला कृतीची जोड देत जामा मस्जिद व जमातुल मुस्लिमीन, टेमपाले यांच्या वतीने माणगाव उपजिल्हा रुग्णालयात रुग्णांना फळवाटपाचा उपक्रम राबविण्यात आला.

जमातुल मुस्लिमीन टेमपाले गावचे अध्यक्ष अब्दुलअजीज गजगे यांच्या मार्गदर्शनाखाली रुग्णालयातील रुग्ण तसेच कर्मचाऱ्यांना जवळपास १०० फळांच्या पाकिटांचे वाटप




करण्यात आले. यावेळी उपजिल्हा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. मानसी मिरजकर, रुग्णालयीन कर्मचारी ऋतिक चोगले, क्लार्क विश्वनाथ तावरी, परिचारिका, वॉर्डबॉय तसेच जमातुल मुस्लिमीन टेमपालेचे उपाध्यक्ष अब्दुलअजीज अलसुलकर, मुफ्ती मुझफ्फर सेन, पोलीस पाटील समीर मुरुडकर, सुहेब अलसुलकर, साजिद खानदेशी, जहीर अलसुलकर, अजीज अलसुलकर, इनायत लोखंडे, अमान अलसुलकर, यासिन सेन, मोहम्मद गजगे, राहील दाखवे यांच्यासह मौलाना इरफान किरकिरे, हाफिज अहमद सेन, जहिर वाडेकर आदी उपस्थित होते.

रुग्णांच्या आरोग्यासाठी प्रार्थना करत त्यांना फळांचे वाटप करणे हा केवळ एक कार्यक्रम नसून समाजातील परस्पर प्रेम, बंधुभाव आणि सामाजिक बांधिलकी जपण्याचा सुंदर प्रयत्न असल्याची भावना यावेळी व्यक्त झाली.

उपजिल्हा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. मानसी मिरजकर यांनी जमातुल मुस्लिमीन टेमपालेच्या या सामाजिक उपक्रमाचे विशेष कौतुक केले. रुग्णांच्या सेवेसाठी पुढाकार घेतल्याबद्दल त्यांनी आयोजकांचे तसेच ग्रामस्थांचे आभार मानले.

# कर्जत तालुक्यातील दीड दिवसांच्या १९७२ गणरायांचे विसर्जन

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यात ९२१० गणरायांची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली असून सार्वजनिक व खासगी अशा एकूण दीड दिवसांच्या १९७२ गणरायांचे सश्रूनयनांनी 'पुढच्या वर्षी लवकर या'च्या गजरात विसर्जन करण्यात आले. विसर्जनाच्या वेळी पावसाने उघडीप दिल्याने श्री गणेशमूर्ती वाजत गाजत गणेश घाटावर आणण्यात आल्या.

तालुक्यात दीड दिवस, पाच दिवस, सहा दिवस, अनंत चतुर्दशी, व २१ दिवस अशी श्री गणेशमूर्तींची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. त्यापैकी दीड दिवसांच्या गणरायांचे विसर्जन



करण्यात आले. यापैकी १२३७ कर्जत पोलीस ठाण्याच्या हद्दीतील, ६९५ नेरळ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आणि ३९ माथेरान पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अशा १९७१ खासगी गणरायांचे व माथेरानमधील एकमेव सार्वजनिक श्री गणेशमूर्तींचा समावेश आहे.

सायंकाळी चार वाजल्यापासूनच गणरायाच्या विसर्जनाला सुरुवात झाली. काहींनी वाजत गाजत, तर काहींनी आपापल्या चारचाकी वाहनांतून गणेशमूर्ती गणेश घाटावर आणल्या. काही मूर्तींचे गावांमध्ये तलावात विसर्जन करण्यात आले.

दरम्यान, विसर्जनाला कोणतेही गालबोट लागू नये म्हणून उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# गणेशोत्सवात राज्यप्रतीकांचा जागर

## पाली येथील देखाव्यातून जैवविविधता संवर्धनाचा संदेश

**पाली : प्रतिनिधी**

पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत पालीतील अंबिके कुटुंबीयांनी सालाबादप्रमाणे यंदाही पर्यावरणपूरक घरगुती गणेशोत्सव २०२६ साकारला आहे. यंदाच्या सजावटीची मध्यवर्ती संकल्पना "राज्यप्रतीकांचा जागर, जैवविविधतेचा संकल्प" अशी आहे. महाराष्ट्राच्या राज्यप्रतीकांची ओळख सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासोबतच त्यांच्या संवर्धनाचा संदेश देणारा हा आगळावेगळा पर्यावरणपूरक माहितीपूर्ण देखावा लक्षवेधी ठरत आहे.



या देखाव्यात प्रामुख्याने शाडू मातीची पर्यावरणपूरक गणेशमूर्ती साकारण्यात आली आहे. त्यासोबत महाराष्ट्राच्या विविध राज्यप्रतीकांची आकर्षक मांडणी करण्यात आली असून, प्रत्येक प्रतीकाची ओळख, मान्यता मिळाल्याचे वर्ष, वैशिष्ट्य आणि पर्यावरणीय महत्त्व माहितीफलकांद्वारे स्पष्ट करण्यात आले आहे. राज्यवृक्ष, राज्यफूल, राज्यप्राणी, राज्यपक्षी, राज्यमाता, राज्यशस्त्र, राजभाषा आदी प्रतीकांच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या नैसर्गिक व सांस्कृतिक वैभवाचा परिचय करून देण्यात आला आहे.

विशेष म्हणजे, हा देखावा साकारताना कागद, पुठ्ठा, दोरा, रंग तसेच उपलब्ध टाकाऊ वस्तूंचा कल्पकतेने पुनर्वापर करण्यात आला आहे. पाणी, फुले, हिरवाई आणि नैसर्गिक घटकांच्या सुंदर मांडणीमुळे देखाव्याला निसर्गरम्य स्वरूप प्राप्त झाले आहे. विविध संदेशपर घोषवाक्यांच्या माध्यमातून "निसर्ग जपा, जैवविविधता जपा आणि महाराष्ट्राचा वारसा जपा" असा प्रभावी संदेश देण्यात आला आहे.

राष्ट्रीय प्रतीकांची माहिती सर्वसामान्यांना सहज सांगता येते; मात्र आपल्या महाराष्ट्राची राज्यप्रतीके कोणती, त्यांची वैशिष्ट्ये काय आणि त्यांचे संवर्धन का आवश्यक आहे, याची माहिती अनेकांना नसते. हीच माहिती समाजापर्यंत पोहोचावी आणि आपल्या राज्याच्या नैसर्गिक व सांस्कृतिक वारशाबद्दल जाणीव निर्माण व्हावी, हा या सजावटीमागील मुख्य उद्देश आहे, असे आयडॉल शिक्षक राजेंद्र अंबिके यांनी सांगितले.

### क्यूआर कोडचा वापर

या उपक्रमाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक राज्यप्रतीकाशी संबंधित अधिक माहिती क्यूआर कोडच्या माध्यमातून डिजिटल स्वरूपात उपलब्ध करून देण्यात आली आहे. क्यूआर कोड स्कॅन केल्यानंतर संबंधित प्रतीकाविषयी सविस्तर माहिती मिळते. त्यासोबतच संपूर्ण देखाव्याला माहितीपूर्ण ऑडिओ निवेदनाची पार्श्वभूमी देण्यात आली असून, त्यामुळे भेट देणाऱ्यांना केवळ दृश्य माध्यमातून नव्हे तर ऐकूनही राज्यप्रतीकांची माहिती समजून घेता येते.


# वाडगावात रविवारी खासदार केसरी कुस्ती स्पर्धेचा थरार

**रेवदंडा : प्रतिनिधी**

वाडगाव (ता. अलिबाग) येथे खासदार सुनील तटकरे कुस्ती प्रशिक्षण केंद्र, स्व. दिलीप आंग्रे सार्वजनिक व्यायामशाळा आणि ग्रुप ग्रामपंचायत वाडगावच्या स्वागत कमानीचा लोकार्पण सोहळा २० सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्यानिमित्त हनुमान तालीम संघ व ग्रामस्थ यांच्या संयुक्त विद्यमाने खासदार केसरी कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

ग्रामीण भागातील कुस्तीपटूंना प्रोत्साहन देण्यासाठी तसेच नवोदित मल्लांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. विजेत्यांसाठी आकर्षक रोख पारितोषिके ठेवण्यात आली असून प्रथम क्रमांकासाठी एक लाख रुपये, द्वितीय क्रमांकासाठी ७५ हजार रुपये आणि तृतीय क्रमांकासाठी ५० हजार रुपये अशी पारितोषिके देण्यात येणार आहेत.

यावेळी खासदार सुनील तटकरे यांच्यासह मंत्री आदिती तटकरे, रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे, जिल्हा परिषद उपाध्यक्ष मधुकर पाटील, महिला जिल्हाध्यक्षा उमा मुंढे, विधान परिषद सदस्य अनिकेत सुनील तटकरे, रायगड पोलीस अधीक्षक आंचल दलाल, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सुधाकर घारे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, उपवनसंरक्षक उमेश वावरे, समाजकल्याण समितीचे सभापती नारायण डामसे उपस्थित राहणार आहेत.





**खोपोली : उपनगराध्यक्ष विक्रम साबळे यांच्या निवासस्थानी विराजमान श्री गणेशाचे दर्शन तहसीलदार अभय चव्हाण, मुख्याधिकारी पंकज पाटील, नायब तहसीलदार राठोड आदी मान्यवरांनी घेतले. यावेळी उद्योजक यशवंत साबळे यांनी सर्वांचे स्वागत केले.**



**रणधीर महादेव कनोजे, माणगाव**



**भाजप शहर सरचिटणीस विनायक माडपे, खोपोली**




खारघर : भाजप राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी महापौर नितीन पाटील यांच्या शासकीय निवासस्थानी तसेच युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्हा सचिव शुभ पाटील यांच्या निवासस्थानी विराजमान गणरायाचे दर्शन घेतले. सोबत इतर मान्यवर आणि कुटुंबीय.



पनवेल : भाजप नेते एकनाथ देशेकर आणि जि.प. सदस्य कमला देशेकर यांच्या निवासस्थानी स्थानापन्न बाप्पा.



मंथन मंगेश पिलविळकर, पनवेल



सतिश उगले, कळंबोली



दत्ताराम गुरुजी, बेलपाडा, पनवेल



जान्हवी प्रकाश म्हात्रे, खारकोपर, पनवेल



खुटारकर परिवार, नावडे



रामदास खाने, खानेअंबिवली, मोहोपाडा



शिवदास कृष्णा पाटील, चिर्ले, उरण



खंडू पोपट राळे, कामोठे से.१०



माळी परिवार, बालई, उरण



रवींद्र पाटील, कोंडले, पनवेल



रिया राकेश खराडे, मोहोपाडा



रोशन शिवराम म्हसकर, नारपोली, पनवेल



पवन सोसायटी सेक्टर ७, खांदा कॉलनी



रवींद्र गणपत ठाकूर, दिघोडे, उरण







॥ श्री गणेशाय नमः ॥

राम प्रहर




तुमचा लाडका बाप्पा झळकणार 'दै. रामप्रहर'मध्ये!

गणेशोत्सवाच्या पावन पर्वावर दैनिक रामप्रहर घेऊन येत आहे सर्व गणेशभक्तांसाठी एक सुवर्णसंधी!
आपल्या लाडक्या बाप्पाचे मनमोहक रूप आता सगळ्यांना पाहू द्या...
२४ सप्टेंबरपर्यंत घरगुती आणि सार्वजनिक मंडळांच्या गणरायाचे फोटो 'रामप्रहर'मध्ये विनामूल्य प्रसिद्ध केले जाणार आहेत.

**बाप्पाचा फोटो इथे पाठवा**
ई-मेल आयडी : ramprahar@gmail.com
व्हॉट्सॲप क्रमांक : ७७३८७१०६००९

**फोटोसोबत खालील माहिती नक्की पाठवा**
- घरगुती गणपती असल्यास : कुटुंबप्रमुखाचे नाव आणि संपूर्ण पत्ता
- सार्वजनिक गणपती असल्यास : मंडळाचे नाव आणि पत्ता

चला तर मग या गणेशोत्सवात तुमच्या बाप्पाचा सुंदर फोटो आणि माहिती आमच्यापर्यंत पोहचवा आणि आपल्या बाप्पाचे रूप सर्वांपर्यंत घेऊन जा...

**दैनिक रामप्रहर : सदैव तुमच्या सोबत!**


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com